दैनिक

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २५१ I बुधवार २४ जून २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com





## भारतभूमी व सहजयोग

सर्व प्रथम, सर्व गोष्टी विसरून धर्म आदी किंवा सायन्सच्या वगैरे एक मनुष्याने असा विचार केला पाहिजे की आम्ही ह्या संसारात कशासाठी आलो? आमच्या जीवनाचं लक्ष्य काय आहे? जर आम्ही एका अमिबापासून आज मानवस्थितीला आलो तर ते कशासाठी? या जीवनाला काही अर्थ आहे किंवा नाही? अर्थात या भारतभूमीमध्ये विशेषतः महाराष्ट्रात जिथे आपली साडे तीन पीठे बसली आहेत, विश्वाची सर्व कुंडलिनी आहे, अशा महान देशामध्ये जन्मलेल्या लोकांना हे तर माहीतच आहे की या संसारातून ज्याला आत्मसाक्षात्कार मिळाला तो महान झाला तेच सगळ्यात मोठं मिळवायचं आहे. त्यातून काही नवीन नवीन मंडळी पाश्चिमात्य देशात जाऊन शिक्षण घेऊन आली आणि त्यांना असा प्रश्न पडलेला असतो की देव वगैरे काही नसतो, आहे की नाही किंवा हे जे काही कुंडलिनी बद्दल एवढं मोठं लिहिलेलं आहे, ते ज्ञानेश्वर आपल्या सहाव्या अध्यायात सांगून गेलेत. तुकारामांनी ज्या परमात्म्याला मिळवण्याच्या गोष्टी केल्या. नामदेव आदी अनेक संतांनी या भूमीवर परमेश्वराच्या बद्दल जे सृजन केलेले आहे ते खरं होतं की खोटं होतं? ते खरे होते किंवा भ्रमित होते? त्यांनी जी गोष्ट केली त्याच्यात काही अर्थ होता की उगीचंच त्यांनी काहीतरी करायचं, सांगायचं म्हणून सांगितलं. या आपल्या मानव देहाचं तरी मूळ काय? किंवा त्याच्यापेक्षाही या संबंध आपल्या व्यक्तित्वाचं आणि आपल्या ह्या मानवी जीवनाचं तरी मूळ काय.

१७ जानेवारी १९८३,नाशिक

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..

### नागपुरात टॅक्सी चालकांचे आंदोलन हिंसक

नागपूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गृह शहर असलेल्या नागपुरात बाईक टॅक्सी सेवांविरोधात ॲप-आधारित टॅक्सी चालकांनी सोमवारपासून पुकारलेल्या अनिश्चितकालीन संपाला पहिल्या दिवशी नागपुरात हिंसक वळण लागले होते. संपात सहभागी नसल्याच्या संशयावरून नरेंद्र नगर परिसरात एका टॅक्सीची तोडफोड करण्यात आली, तर दुसऱ्या चालकाला मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी अजनी पोलिस ठाण्यात दोन अदखलपात्र गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. तर दुसऱ्या दिवशी मंगळवारी आंदोलकांनी मोर्चा काढला. नरेंद्र नगरमधील सुयोगनगर परिसरात मंगळवारी काही संपकरी चालक फिरत असताना त्यांना दोन टॅक्सी दिसल्या. संप सुरू असतानाही काही चालक सेवा देत असल्याची चर्चा पसरल्यानंतर एका टॅक्सीची काच फोडण्यात आली, तर दुसऱ्या चालकाला मारहाण करण्यात आल्याचा आरोप आहे.


# विकास निधी शिल्लक ठेवून स्वतःच्याच विकासासाठी बंडखोरी..?

## ठाकरेंच्या फुटलेल्या ६ खासदारांचा दावा आकडेवारीने खोडला

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

मुंबई :शिवसेना ठाकरे गटातील सहा बंडखोर खासदारांनी सोमवारी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत अधिकृतपणे शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी ऑपरेशन टायगर फुलप्रुफ होते आणि ते यशस्वी झाले, अशी घोषणा एकनाथ शिंदे यांनी केली. तसेच हे सहाही खासदार आगामी निवडणुकीत धनुष्यबाण चिन्हावर लढतील आणि विजयी होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, पक्षांतराचे समर्थन करताना अनेक खासदारांनी विरोधी पक्षातील खासदारांना विकास निधी मिळत नसल्याने मतदारसंघातील विकासकामे रखडत असल्याचा आरोप केला. मात्र खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेच्या (एमपीलॅड) उपलब्ध आकडेवारीमुळे या दाव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.





समोर आलेल्या माहितीनुसार, फुटलेल्या सहा खासदारांना कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर झाला असतानाही त्यातील मोठा हिस्सा खर्च झालेला नाही. अनेक ठिकाणी मंजूर कामांपैकी अत्यल्प कामे पूर्ण झाल्याचे दिसून येत आहे.

शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना १४.७० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असताना केवळ ७१ लाख रुपये खर्च झाले आहेत. १३५ कामांपैकी अवघी दोनच कामे पूर्ण झाली असून तब्बल १३.९८ कोटी रुपये शिल्लक असल्याचे आकडेवारी दर्शविते.

वाशिमचे खासदार संजय देशमुख यांच्याकडे १७.१४ कोटी, धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांच्याकडे १६.४९ कोटी, तर ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांच्याकडे १४.५४ कोटी रुपये निधी शिल्लक असल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे संजय दिना पाटील यांच्या ४० कामांपैकी एकही काम पूर्ण झाल्याची नोंद नाही.

या पार्श्वभूमीवर निधी मिळत नव्हता म्हणून विकासकामे झाली नाहीत हा युक्तिवाद कितपत ग्राह्य धरायचा, असा सवाल राजकीय वर्तुळात उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, धाराशिवचे खासदार ओम राजे निंबाळकर यांनी या टीकेला उत्तर देताना, खासदार निधीचे(पान ४ वर)



# महाराष्ट्रातील सात दिग्गजांना पद्म पुरस्कारांचा बहुमान

### रोहित शर्मा, आर. माधवन, अलका याज्ञिक यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** देशातील सर्वोच्च नागरी सन्मान मानल्या जाणाऱ्या पद्म पुरस्कारांचे वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनातील गणतंत्र मंडप येथे दिमाखदार सोहळ्यात करण्यात आले. या सोहळ्यात महाराष्ट्रातील सात मान्यवरांना त्यांच्या विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल पद्म पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

कला क्षेत्रातील प्रदीर्घ आणि बहुमोल योगदानासाठी प्रसिद्ध पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांना पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांनी १६ हून अधिक भाषांमध्ये हजारो गाणी गाऊन भारतीय संगीत क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

पद्मश्री पुरस्कार प्राप्त मान्यवरांमध्ये भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार रोहित शर्मा, अभिनेते-दिग्दर्शक आर. माधवन, नवजात शिशुवैद्यक क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. आर्मिडा फर्नांडिस, वारली आदिवासी संस्कृतीचे जतन करणारे ज्येष्ठ तारपावादक भिकल्या लाडक्या धिंडा, उद्योजक अशोक खाडे आणि दिवंगत अभिनेते सतीश शाह यांचा समावेश आहे. सतीश शाह यांना मरणोत्तर हा सन्मान जाहीर करण्यात आला असून त्यांच्या वतीने पुरस्कार स्वीकारण्यात आला. (पान ४ वर)

## सकाळी आदेश, संध्याकाळी समुपदेशन...

# १२३ केंद्रप्रमुख पदोन्नतीसाठी २९५ शिक्षकांची उडाली धावपळ

करण नवले I राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : प्रशासन वेगवान असावे, निर्णय तत्काळ व्हावेत आणि कामकाजाला गती मिळावी, अशी अपेक्षा सर्वसामान्यांची असते. मात्र अहिल्यानगर जिल्हा परिषद शिक्षण विभागाने ही अपेक्षा अक्षरशः इतक्या गांभीर्याने घेतली की, जिल्हाभरातील केंद्रप्रमुख पदोन्नतीसाठी पात्र ठरलेल्या शिक्षकांना सकाळी आदेश काढून त्याच दिवशी संध्याकाळी बैठकीला उपस्थित राहण्याचे फर्मान सोडले. परिणामी, अनेक शिक्षकांची अक्षरशः धावपळ उडाली असून या आदेशाची जिल्हाभरात जोरदार चर्चा रंगली आहे. १२३ केंद्रप्रमुख नियुक्तींसाठी जिल्हाभरातून सुमारे २९५ पात्र शिक्षकांना यावेळी बोलावण्यात आले. मात्र ऐनवेळी आदेश पाठवल्याने अनेक जण उपस्थित राहण्यापासून वंचित राहिल्याची चर्चा आहे.

केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रियेतील पात्र उमेदवारांसाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागाने २३ जून रोजी समुपदेशन आयोजित केले होते. याबाबतचे पत्र जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या सहीने त्याच दिवशी जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना पाठविण्यात आले. पत्रानुसार पात्र उमेदवारांनी सायंकाळी पाच वाजता जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच पात्र-अपात्र यादीबाबत काही हरकती असल्यास त्या तात्काळ जिल्हा परिषदेकडे पाठविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या होत्या.

तत्पूर्वी, या पदोन्नती प्रक्रियेचा प्रवास





**विशेष म्हणजे पात्र-अपात्र यादीबाबत हरकती मागविण्याची प्रक्रिया सुरू असतानाच समुपदेशन घेण्यात आल्याने काही शिक्षकांनी प्रक्रियेच्या वेळापत्रकावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. इतक्या महत्त्वाच्या पदोन्नती प्रक्रियेत उमेदवारांना किमान काही दिवसांचा अवधी दिला असता तर अनावश्यक गैरसोय टाळता आली असती, अशी भावना शिक्षकांमधून व्यक्त होत आहे.**

मात्र अत्यंत संथ गतीने सुरू होता. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर जवळपास महिनाभर कोणतीही ठोस हालचाल झाली नव्हती. त्यानंतर ११ ते १३ जून दरम्यान पात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. पडताळणीनंतर पुढील टप्प्यासाठी काही दिवसांचा अवधी मिळेल, अशी शिक्षकांची अपेक्षा होती. मात्र अवघ्या दहा दिवसांत थेट समुपदेशनाचे आदेश काढून प्रक्रिया पुढे नेण्यात आली. अहिल्यानगर जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार मोठा असल्याने अकोले, कर्जत, जामखेड, शेवगाव, कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, संगमनेर आणि पाथर्डीसारख्या दूरवरच्या तालुक्यांतील शिक्षकांसमोर काही तासांत जिल्हा मुख्यालय गाठण्याचे आव्हान उभे राहिले. अनेक शिक्षक जिल्ह्याबाहेर होते, काहीजण वैद्यकीय कारणांमुळे रुग्णालयात होते, तर काहीजण कौटुंबिक कार्यक्रमांसाठी बाहेर गेले होते. अनेकांना व्हॉट्सॲपवरील संदेश वेळेत पाहताही आला नाही. (पान ४ वर)

# भीषण अपघातात पती-पत्नी जागीच ठार

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**सुपा :** सुपा ते पारनेर मार्गावरील कन्हेर ओहोळ परिसरात मंगळवारी (दि. २३) सकाळी झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या प्रकरणी पारनेर पोलिसांनी काँक्रीट मिक्सर चालकाविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. अपघातानंतर वाहन चालक फरार झाला.

**सुपा-पारनेर रस्त्यावर कन्हेर ओहोळ परिसरातील दुर्घटनेने हळहळ**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भिमराव गुंडू कांबळे आणि त्यांची पत्नी गौरी भिमराव कांबळे (सध्या रा. सुपा, ता. पारनेर, मूळ रा. उमगाव, ता. चंदगड, जि. कोल्हापूर) हे दोघे त्यांच्या स्कुटी (क्र. एमएच-०९ जीएन-५३०३) वरून सुपा येथून (पान ४ वर)

# विजय पठारे व टोळीविरूध्द मोक्का

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नगर शहरात दहशत निर्माण करणारा विजय राजू पठारे व त्याच्या टोळी विरुध्द मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. मोक्का कारवाई करण्यात आलेल्यांमध्ये एकूण पाच आरोपींचा समावेश आहे. विजय पठारे व टोळी विरुद्ध तोफखाना कोतवाली व भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुमारे १२ गुन्हे दाखल आहेत.

विजय पठारे टोळी विरुद्ध तोफखाना, कोतवाली व भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीत गैर कायदयाची मंडळी जमवून धारदार शस्त्राचा वापर करुन हत्येचा प्रयत्न करणे, हद्दपार आदेशाचे उल्लंघन करणे, गैर कायद्याची मंडळी जमवून घातक शस्त्रासह संघटीतपणे टोळीसह दरोडा टाकणे, शासकीय कामात अडथळा निर्माण करुन दहशत निर्माण करणे, धारधार शस्त्र जवळ बाळगणे, प्राणघातक शस्त्रांनीशी सज्ज होऊन घरात घसन गंभीर दुखापत करणे, स्त्रीला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणे यासारखे गंभीर १२ गुन्ह्यांचा समावेश आहे .

पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांनी आरोपींविरुध्द मोक्का कायद्याअंतर्गत वाढीव कलम लावण्याचा प्रस्ताव सादर केला होता. त्यावर विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी विजय राजू पठारे (टोळी प्रमुख), अजय राजू पठारे, किरण मोहन जेधिया, सनी रणजित चावरे, निलेश बाबासाहेब ससाणे (सर्व रा. मुन्सिपल कॉलनी, सिद्धार्थनगर) यांच्या विरुध्द मोक्का कायदयान्वये वाढीव कलम लावण्याची मंजुरी दिलेली असून तपास उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे हे करत आहेत.

# राष्ट्रपती पदकाची अब्रू वेशीवर!

## हप्ता न मिळाल्याने खोटा गुन्हा दाखल करणारा फौजदार सस्पेंड!

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर:** गोरगरिबांच्या तोंडचा हक्काचा खिचडीचा भात पळवणाऱ्या आणि पदाचा गैरवापर करणाऱ्या स्थानिक गुन्हे शाखेच्या एका पोलीस उपनिरीक्षकाला अखेर निलंबित करण्यात आले आहे. राजेंद्र देवमन वाघ असे या निलंबित राष्ट्रपती पदक मिळवलेल्या पोलीस उपनिरीक्षकाचे नाव आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी ही कडक कारवाई केली आहे.

काही दिवसांपूर्वी नेवासा पोलीस ठाण्यात जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यामध्ये दोघांची नावे हेतुपुरस्सर अडकवण्यात आली होती. पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ यांनी स्वतःच्या आर्थिक लाभासाठी बेकायदेशीरपणे हप्त्याची मागणी केली होती. परंतु, समोरच्या बाजूने हा हप्ता देण्यास नकार दिल्यामुळे चिडून वाघ यांनी हा खोटा गुन्हा दाखल केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या गंभीर प्रकारानंतर वाघ यांच्यावर विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. चालू चौकशीच्या काळात त्यांनी पुराव्यांशी छेडछाड करू नये किंवा साक्षीदारांवर कोणताही दबाव आणू नये, यासाठी पोलीस अधीक्षकांनी त्यांना तात्काळ सेवेतून निलंबित केले आहे. निलंबन काळात वाघ यांना खाजगी (पान ४ वर)

# ओबीसी प्रवर्गाप्रमाणे मराठा समाजाला शैक्षणिक सवलती देण्याच्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करा : ना. विखे पाटील

## मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीची महत्त्वपूर्ण बैठक

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मराठा समाजातील विद्यार्थ्यांना ओबीसी प्रवर्गाप्रमाणे शैक्षणिक व इतर सवलती देण्याबाबत दिनांक ५ जून २०२६ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयाप्रमाणे संबंधित विभागांनी तात्काळ अंमलबजावणी करावी, असे स्पष्ट निर्देश जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

विधानभवनात मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीत मराठा आरक्षणाशी संबंधित विविध प्रलंबित विषयांचा आढावा घेण्यात आला आणि झालेल्या निर्णयाप्रमाणे अंमलबजावणी



करण्यासाठी प्रशासनाला गती देण्याचे निर्देश देण्यात आले. या बैठकीस मंत्री श्री. गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री श्री. दादा भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. शिवेंद्रसिंह राजे भोसले, पर्यटन मंत्री श्री. शंभूराज देसाई, माहिती तंत्रज्ञान मंत्री श्री. आशिष शेलार, मदत व पुनर्वसन मंत्री श्री. मकरंद जाधव, सहकार मंत्री श्री. बाबासाहेब पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. हसन मुश्रीफ, रोजगार व उद्योजकता मंत्री श्री. मंगल प्रभात लोढा यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जिल्हास्तरावर मराठा समाजाच्या अडचणी आणि शंकांचे निरसन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा स्तरावर तातडीने हेल्पलाइन कार्यान्वित करण्यात यावी. तालुका आणि जिल्हा स्तरावर प्राप्त होणारी निवेदने व मागण्यांचे, अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या थेट देखरेखीखाली वर्गीकरण करण्याची प्रक्रिया सुरू करावी. स्थानिक पातळीवरील मागण्यांचे तात्काळ निराकरण करण्यात यावे, तसेच ज्या मागण्या/निवेदने राज्य शासनाशी संबंधित आहेत, ती आवश्यकतेनुसार तात्काळ शासनाकडे सादर करावीत, असा महत्त्वपूर्ण निर्णय बैठकीत घेण्यात आला. जिल्हा व तालुकास्तरीय तक्रार निवारण प्रक्रियेचा प्रत्येक आठवड्याला सविस्तर आढावा घेऊन कार्यवाही करावी आणि त्याबाबतचा प्रगती अहवाल दर आठवड्याला राज्य शासनास सादर करावा, असे निर्देश मंत्रिमंडळ उपसमितीने प्रशासनाला दिले आहेत. राज्य सरकारने ५ जून २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार मराठा समाजातील किती विद्यार्थ्यांना आतापर्यंत या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळाला आहे, याची सविस्तर आकडेवारी संबंधित विभागाने पुढील बैठकीत अनिवार्यपणे सादर करावी, असे निर्देश मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बैठकीत अधिकाऱ्यांना दिले आहेत.

मराठा आरक्षणाच्या उपसमितीची बैठक आता नियमितपणे घेतली जाणार आहे. चालू अधिवेशन कालावधी संपल्यानंतर, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर या उपसमितीची बैठक घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला. मराठा समाजाच्या विविध योजना आणि आरक्षणाशी संबंधित बाबींचा पाठपुरावा करण्यासाठी एक स्वतंत्र 'मराठा कक्ष' तात्काळ कार्यरत करण्यात यावा, असा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. न्यायमूर्ती शिंदे समितीच्या कामकाजाला गती देण्यासाठी त्यांना स्वतंत्र कार्यालयीन जागा उपलब्ध करून देण्याबाबतचा निर्णय तात्काळ घेण्यात यावा, अशा सूचनाही संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

# समानतेच्या युगातील गुन्हेगारीचे नवे समीकरण

समाजात एखादी भीषण हत्या, अत्याचार किंवा फसवणुकीची घटना घडली की जनमताचा उद्रेक होतो. सामाजिक माध्यमांपासून वृत्तवाहिन्यांपर्यंत संतापाची लाट उसळते. मात्र या संतापाची तीव्रता सर्व घटनांमध्ये सारखी असते का, हा प्रश्न आता गंभीरपणे विचारण्याची वेळ आली आहे. विशेषतः गुन्हेगार पुरुष असेल तर त्याच्याविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटते; परंतु गुन्हेगार महिला असेल तर त्याच प्रमाणात सामाजिक निषेध दिसतोच असे नाही. ही वस्तुस्थिती अस्वस्थ करणारी आहे.

स्त्री म्हणजे ममता, त्याग, संवेदनशीलता आणि कुटुंबव्यवस्थेचा आधारस्तंभ, अशी प्रतिमा भारतीय समाजाने दीर्घकाळ जपली आहे. या प्रतिमेमागे वास्तवाचा मोठा भागही आहे. इतिहासापासून आजपर्यंत असंख्य महिलांनी कुटुंब, समाज आणि राष्ट्र उभारणीत मोलाचे योगदान दिले आहे. महिला सक्षमीकरणाची चळवळ ही अन्यायाविरुद्धची आणि समान संधींसाठीची लढाई होती व आहे. मात्र याच वास्तवाच्या दुसऱ्या बाजूकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

अलीकडच्या काळात काही गुन्हेगारी घटनांनी समाजाला धक्का दिला आहे. विवाहबाह्य संबंध, आर्थिक लाभ, मालमत्तेची लालसा, सूडभावना किंवा सामाजिक दबाव यांसारख्या कारणांमुळे महिलांनीही गंभीर गुन्हे केल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. हनी ट्रॅप, ब्लॅकमेलिंग, आर्थिक खंडणी, पतीची हत्या, कौटुंबिक छळ किंवा कटकारस्थानांमध्ये महिलांचा सहभाग असल्याचे अनेक तपासांत निष्पन्न झाले आहे. अर्थात या घटनांवरून संपूर्ण स्त्रीसमाजाचे चित्र रंगविणे अन्यायकारक ठरेल; परंतु अशा

**विशेष संपादकीय**
**करण नवले, संपादक**

घटनांचे अस्तित्व नाकारणेही तितकेच चुकीचे ठरेल.

अलीकडेच चर्चेत आलेल्या केतन अग्रवाल प्रकरणाने समाजमन हादरवले आहे. विवाहाची स्वप्ने पाहणारा, आपल्या होणाऱ्या पत्नीच्या वाढदिवसाच्या तयारीत असलेला एक तरुण कटकारस्थानाचा बळी ठरतो. पोलिस तपासात त्याच्या होणाऱ्या पत्नीचा आणि तिच्या प्रियकराचा सहभाग समोर आल्याचा आरोप आहे. न्यायालयीन प्रक्रिया अंतिम सत्य निश्चित करेल; मात्र या घटनेने 'गुन्हेगाराचे लिंग नव्हे, तर गुन्ह्याचे स्वरूप महत्त्वाचे असते', हे अधोरेखित केले.



राष्ट्रीय गुन्हे नोंदवही ब्युरोच्या आकडेवारीनुसार भारतातील एकूण गुन्हेगारीमध्ये महिलांचा वाटा पुरुषांच्या तुलनेत अजूनही खूप कमी आहे. तथापि, मागील दोन दशकांत महिला आरोपींच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याचे चित्र दिसते. २००१ साली भारतीय दंड संहितेअंतर्गत नोंद झालेल्या गुन्ह्यांमध्ये महिलांचा सहभाग सुमारे ५.४ टक्के होता, तो पुढील दशकात ६ टक्क्यांपेक्षा अधिक झाला. २००५ मध्ये खुनाच्या आरोपाखाली ३,४०० हून अधिक महिलांना अटक करण्यात आली होती, तर २००९ पर्यंत हा आकडा ४,००० च्या पुढे गेला. जीवे मारण्याचा प्रयत्न, फसवणूक, हुंडाबळी, मानवी तस्करी, अमली पदार्थांची वाहतूक, आर्थिक गुन्हे आणि कौटुंबिक छळाच्या प्रकरणांमध्येही महिला आरोपींची संख्या वाढत असल्याचे विविध अहवाल दर्शवितात. तुरुंगातील महिला कैद्यांच्या संख्येतही गेल्या काही वर्षांत वाढ झालेली दिसून येते. अर्थात, या सर्व आकडेवारीनंतरही एकूण हिंसक गुन्ह्यांमध्ये पुरुष आरोपींचे प्रमाण प्रचंड जास्त आहे, हे वास्तव नाकारता येत नाही.

कौटुंबिक छळाच्या अनेक प्रकरणांत सासू, नणंद किंवा इतर महिला नातलगांचा सहभाग असल्याचे न्यायालयीन प्रकरणांत दिसून आले आहे. हुंडाबळी, मानसिक छळ किंवा कौटुंबिक कटुता यामध्ये महिला-पुरुष दोघांचाही सहभाग असू शकतो. त्यामुळे प्रत्येक घटनेचा अभ्यास लिंगाच्या चष्म्यातून नव्हे तर तथ्यांच्या आधारे करणे आवश्यक आहे.

या बदलामागील कारणांचाही गांभीर्याने विचार व्हायला हवा. झपाट्याने होणारे शहरीकरण, बदलती कौटुंबिक रचना, आर्थिक स्पर्धा, वैयक्तिक स्वातंत्र्याच्या वाढत्या संकल्पना, सामाजिक माध्यमांचा प्रभाव, मानसिक आरोग्याच्या समस्या आणि नातेसंबंधांतील अस्थिरता हे घटक समाजशास्त्रज्ञांच्या चर्चेचे विषय आहेत.

म्हणूनच या विषयाकडे स्त्रीविरोधी किंवा पुरुषविरोधी दृष्टिकोनातून पाहणे धोकादायक ठरेल. एका बाजूला महिलांविरुद्ध होणाऱ्या अत्याचारांविरुद्ध समाजाने अधिक सजग राहिले पाहिजे; तर दुसऱ्या बाजूला महिलांकडून होणाऱ्या गंभीर गुन्ह्यांनाही तितक्याच प्रामाणिकपणे सामोरे गेले पाहिजे. न्यायव्यवस्था, समाज आणि माध्यमे यांनी कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय प्रत्येक प्रकरणाचे मूल्यमापन करणे ही काळाची गरज आहे.

गुन्हेगाराचे लिंग, जात, धर्म, भाषा किंवा सामाजिक स्थान कोणतेही असो, गुन्ह्याचा निषेध समान असला पाहिजे. कारण न्यायाचा पाया भावनांवर नव्हे, तर वस्तुनिष्ठतेवर उभा असतो. समाजाला खऱ्या अर्थाने समतावादी बनवायचे असेल, तर स्त्री आणि पुरुष या दोघांसाठीही एकच नैतिक आणि कायदेशीर मापदंड स्वीकारावा लागेल. समानतेची खरी कसोटी तेव्हाच लागेल, जेव्हा आपण पीडित व्यक्तीचे दुःख आणि गुन्हेगाराचा अपराध हे दोन्ही लिंगनिरपेक्ष नजरेने पाहू..!

# ओझर शिवारातील प्रवरानदी पात्रातून वाळूतस्काराचा बेसुमार वाळू उपसा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** तालुक्यातील ओझर येथील प्रवरा नदीपात्रात बेसुमार वाळू उपसा सुरू आहे. त्यामुळे पाटबंधारे विभागाने ओझर बंधाऱ्याच्या वरील आणि खालील बाजूस वाळू चोरी करणाऱ्या अज्ञात इसमांविरुध्द आश्वी पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत. वाळू उपशामुळे नदीपात्राचे नुकसान होऊन पुराचा मोठा धोका निर्माण झाल्याचे म्हटले आहे.

प्रवरा डाव्या कालव्याचे उपविभागीय अधिकारी योगेश घोगरे यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार २० जून रोजी रात्री ११.३० च्या सुमारास त्यांनी पाहणी केली असता, बंधाऱ्याच्या खालील बाजूस ५० हजार रुपये किंमतीची १० ब्रास वाळूची चोरी झाल्याचे आढळून आले. या चोरीमुळे नदीपात्राच्या तिरास धोका निर्माण झाला असून, पाणी प्रदूषित झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

उपविभागीय अभियंता प्रितम शेवाळे यांनी दिलेल्या दुसऱ्या फिर्यादीनुसार, त्याच रात्री बंधाऱ्याच्या वरील बाजूस २० हजार रुपये किंमतीची चार ब्रास वाळूची चोरी झाली आहे. या वाळू उपशामुळे नदीपात्रात खड्डे पडले असून, पाण्याला अडथळा निर्माण झाला आहे. परिणामी, आवर्तनाचा कालावधी वाढून पाण्याचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच नदीपात्राच्या तिरास धोका निर्माण झाल्याने पुराचा धोका वाढला असल्याचे पहिल्या आणि दुसऱ्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान, या दोन्ही प्रकरणांत बीएनएस कलम ३०३(२) सह महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ चे कलम ९३, ९४, ९८ आणि पर्यावरण संरक्षण कायद्याच्या विविध कलमांन्वये आश्वी पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# नगर- मनमाड महामार्गाच्या निकृष्ट कामाची चौकशी करा : निलेश शिरसाठ

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**राहुरी :** शहरातून जाणाऱ्या नगर-मनमाड महामार्गाचे काम होऊन अवघे दोन महिने झाले नाही तरीसुद्धा या रस्त्यावर मोठे मोठे खड्डे पडले असून त्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. तसेच झालेल्या या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे रस्त्यावरील जाणा-या येणा-या वाहनांची तसेच वृयोवृध्द व्यक्ती, शालेय मुले, रुग्णवाहिका इत्यादींना सदर रस्त्याने जाण्या-येण्यासाठी रस्ता मोठ्या प्रमाणात खराब झाल्यामुळे वाहनधारकांना मोठ्या अडचणीं निर्माण होत आहे. तसेच सदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे झाल्यामुळे तसेच पावसाळ्यात रस्त्यावर साचणा-या पाण्यामुळे अपघात होऊन जिवीत हानी होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. तसेच सदरचा रस्ता हा पाण्याची टाकी-राहुरी बॅस स्टण्ड-मार्केट यार्ड-धावडे पेट्रोल पंप-राहुरी पी.डब्ल्यु.डी. ऑफिस समोर जुने बस स्टण्ड इ. ठिकाणी या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. त्यामुळे सदरील काम केलेल्या ठेकेदाराची कायदेशीररीत्या चौकशी करुन त्यांचेवर कारवाई लवकरात लवकर करण्यात यावी. सदर ठेकेदारावर यांचेवर ८-१० दिवसांच्या आत कारवाई न केल्यास राहुरी तहसिल कार्यालय येथील उपोषणास बसणार आहेत. तरी उपोषणादरम्यान काही अनुचित प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील असे निलेश शिरसाट यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# राष्ट्रवादीच्या धरणे आंदोलनाला यश

## घरपट्टी वाढीला तूर्तास स्थगिती

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव नगरपरिषदेने केलेल्या अवाजवी वाढीव घरपट्टी व नगरपरिषदेच्या इतर चुकीच्या निर्णयांविरोधात कोपरगाव राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आमदार आशुतोष काळे यांच्या मागर्दर्शनाखाली सोमवार (दि.२२) पासून कोपरगाव शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक याठिकाणी सुरु करण्यात आलेल्या धरणे आंदोलनाला यश आले आहे. सर्वसाधारण सभेत घरपट्टी वाढीच्या प्रस्तावावर निर्णय होत नाही तोपर्यंत कोपरगाव नगरपरिषद प्रशासनाकडून घरपट्टी वाढीला तूर्तास स्थगिती देण्यात आली असल्याचे कोपरगाव नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी मनोजकुमार पापडीवाल यांनी लेखी आश्वासन दिले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसकडून धरणे आंदोलन स्थगित करण्यात आले असल्याचे कोपरगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



कोपरगाव नगरपरिषद प्रशासनाकडून नगरपरिषद हद्दीतील नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्यावर वाढीव दराने घरपट्टी (मालमत्ता कर) आकारण्यात येवून मालमत्ताधारकांना अधिकृत पावत्या देखील वाटप करण्यात आल्या होत्या. केलेली वाढ मोठ्या प्रमाणात असल्यामुळे हि अवाजवी केलेली वाढ कोपरगावकरांच्या खिशाला अजिबात परवडणारी नव्हती त्यामुळे नागरीकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले होते. परंतु या चुकीच्या घरपट्टी (मालमत्ता कर) वाढी संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसने आवाज उठवून हि करवाढ मागे घ्यावी अशी लेखी मागणी केली होती. मालमत्तांचे वर्गीकरण, निर्धारीकरण कसे केले याची कोणतीही अधिकृत माहिती नागरिकांना देण्यात आली नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण तयार होवून या करवाढीबाबत आमदार आशुतोष काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयात हजारो हरकती नोदाविल्या होत्या.

त्यामुळे कोपरगावकरांना न्याय मिळवून देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने धरणे आंदोलनाचे हत्यार उपसले होते. सुरु करण्यात आलेल्या या धरणे आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी हजारो कोपरगावकरांसह विविध संघटनांचा या आंदोलनाला पाठिंबा मिळाला होता. सलग दुसऱ्या दिवशीही अशीच परिस्थिती राहिल्याने आंदोलनाची व्याप्ती वाढण्यास सुरुवात झाली असतांना कोपरगाव नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी मनोजकुमार पापडीवाल, कर विभागाचे अधिकारी धुमाळ यांनी आंदोलनस्थळी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्या भावना जाणून घेत आंदोलनकर्त्यांच्या मागण्या नगरपरिषदेकडून मान्य केल्या. सर्वसाधारण सभेत घरपट्टी वाढीच्या प्रस्तावावर निर्णय होत नाही तोपर्यंत घरपट्टी वाढीला तूर्तास स्थगिती देण्यात आली असल्याचे लेखी आश्वासन दिले. त्यामुळे कोपरगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसकडून धरणे आंदोलन स्थगित करण्याचे जाहीर करण्यात आले. सर्वसाधारण सभेत घरपट्टी वाढीच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यात येणार असून तोपर्यंत नागरिकांना वाढीव घरपट्टीच्या पावत्या वितरित केल्या जाणार नाहीत असे असले तरी नागरिकांच्या हितासाठी ही आवाजवी घरपट्टी वाढ रद्द किंवा स्थगित करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक सभागृहात ठामपणे पाठपुरावा करणार असल्याचे कोपरगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसकडून सांगण्यात आले आहे.

# थकीत ईपीएफ निधीसाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सामूहिक आत्मदहनाचा ईशारा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** नेवासा ग्रामपंचायत अस्तित्वात असताना व त्यानंतर नगरपंचायत स्थापन झाल्यापासून अनेक स्वच्छता कर्मचारी व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कर्मचारी भविष्य निर्वाह निधी नियमितपणे कपात करण्यात आला आहे.मात्र सदर रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या खात्यात आजपर्यंत जमा करण्यात आलेली नसल्याने सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा मुख्याधिकारी नगरपंचायत यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे

निवेदनात म्हटले आहे की वरील प्रश्नांच्या संदर्भात अनेक वेळा अर्ज, निवेदने व पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. काही कर्मचाऱ्यांचे निधन झाले असून त्यांच्या वारसांनाही हक्काची रक्कम मिळालेली नाही. कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेली रक्कम न जमा करणे ही अत्यंत गंभीर बाब असून संबंधित कर्मचाऱ्यांवर अन्याय करणारी आहे. या निवेदनाची प्राप्ती झाल्यापासून आठ दिवसांच्या आत सर्व कर्मचाऱ्यांचा थकीत ईपीएफ भविष्य निर्वाह निधी त्यांच्या खात्यावर जमा करून त्याबाबतचा अहवाल लेखी स्वरूपात सादर करण्यात यावा, अन्यथा प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात व आपल्या न्याय्य हक्कासाठी समस्त ईपीएफधारक कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांकडून सामूहिक आत्मदहन आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनातून उदभवणाऱ्या कोणत्याही जीवितहानीस अथवा कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नास नेवासा नगरपंचायत प्रशासन व संबंधित अधिकारी पूर्णपणे जबाबदार राहतील असे ही निवेदनात ईशाऱ्याद्वारे स्पष्ट केले आहे. निवेदनावर सतीश सरोदे, कल्पना रामचंद्र चक्रनारायण, उल्हासाबाई बहिरु चक्रनारायण, लीना यशुदास साळवे, शशिकला मनोहर चक्रनारायण, वैजता भोसले,सुनीता ताराचंद चव्हाण यांच्या सहया आहेत

# टोका प्रवरासंगम येथे प्रार्थना सभेला भाविकांचा प्रतिसाद



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील टोका येथील समाज मंदिर प्रांगणात भारतीय लहुजी सेनेचे जिल्हा कार्याध्यक्ष शांतवन खंडागळे यांच्या पुढाकाराने सोमवारी दि.२२ जून रोजी सायंकाळी आयोजित केलेल्या आशीर्वादित प्रार्थना सभेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सभेला हैदराबादचे ख्रिस्ती धर्मगुरू पास्टर किरण जोशी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी आजारी लोकांसाठी आरोग्यदानाची प्रार्थना वचने गायन व पवित्र पाणी शिंपडून केली. कार्यक्रम प्रसंगी किरण पातारे,दिलीप खंडागळे,माधव शिरसागर, नंदलाल सोनवणे,प्रा. लक्ष्मण भवार, सुमित खंडागळे, शुभम सरोदे, बबन खंडागळे, तुषार खंडागळे, आशिष वाल्हेकर, महिला मंडळाच्या सदस्या सुनिता वैरागर, शकुंतला नवगिरे, वैशाली खंडागळे, रेखा काळे, वैशाली सरोदे उपस्थित होते. शांतवन खंडागळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थित भाविकांचे आभार मानले.

# पाडेगाव ऊस संशोधन केंद्रात महिला शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा व प्रक्षेत्र भेट

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे महिला शेतकऱ्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळा व प्रक्षेत्र भेट कार्यक्रम उत्साहात पार पडला.

तालुका कृषी विभाग, हातकणंगले आणि ग्रामपंचायत कबनूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात १५० हून अधिक महिला शेतकरी सहभागी झाल्या.

कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या नेतृत्वाखाली व संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांच्या मार्गदर्शनाखाली 'खेत बचाओ अभियान' आणि 'संतुलित खत वापर जागरूकता अभियान २०२६' अंतर्गत 'आपत्कालीन परिस्थितीत ऊस पिकाचे नियोजन' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ऊस संशोधन केंद्राचे प्रमुख ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे होते.

डॉ. भिलारे यांनी प्रतिकूल परिस्थितीत उसाचे व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. सुरेश उबाळे यांनी नवीन ऊस वाणांची माहिती दिली, तर डॉ. सुरज नलावडे यांनी बदलत्या हवामानामुळे वाढणाऱ्या कीड व रोगांच्या नियंत्रणाबाबत मार्गदर्शन केले. डॉ. दत्तात्रय थोरवे यांनी सुपरकेन नर्सरी तंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले.

दुपारच्या सत्रात महिला शेतकऱ्यांनी संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्राला भेट देत नवीन ऊस वाण व विविध प्रात्यक्षिकांची माहिती घेतली. कार्यक्रमाचे आभार डॉ. किरणकुमार ओंबासे यांनी मानले.

# टाकळीभान येथे आंतरराष्ट्रीय एकल महिला दिन साजरा

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील माजी खासदार गोविंदराव आदिक यांच्या सभागृहात आंतरराष्ट्रीय एकल महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी ग्राम विकास अधिकारी दादासाहेब भिंगारदे अंगणवाडी सुपरवायझर आशाताई खेडकर टाकळीमान एकल महिला संघटनेचे अध्यक्ष मंगल ताई जाधव ज्येष्ठ पत्रकार दिलीपराव लोखंडे यांच्या हस्ते स्त्री शिक्षणाच्या जनक सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच अर्चनाताई रणनवरे होत्या. यावेळी ग्रामविकास अधिकारी भिंगारदे यांनी स्त्री शक्ती सबलीकरण शासनाने एकल महिला बचत गटाच्या माध्यमातून एक रुपयात शेती भेटणार भेटणार आहे. महिलांना लघुउद्योगाकडे शासनाने प्राधान्य दिले आहे. घरकुलासाठी जागा ही शासन उपलब्ध करून देणार आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी सविस्तर माहिती दिली, यावेळी आशाताई खेडकर यांनी शासनाच्या एका महिलांच्या मुला मुलींना बाल संगोपनाचे फॉर्म भरून आर्थिक लाभ घ्यावा एकलडोल चे फॉर्म भरून घ्यावे ज्याचे डोल बंद पडले असेल अशा महिलांनी नावे आमच्याकडे द्यावे आम्ही हे सर्व माहिती शासनाकडे पाठवणार आहे, याविषयी मार्गदर्शन केले याप्रसंगी मीरा गवंदे, सोनल आसणे, अरुणा पाबळे, शिल्पा जाधव, अलका सिद्धेश्वर, कचराबाई गायकवाड, मिराबाई गायकवाड ,तुळसाबाई कांबळे, अनिता लोखंडे, जोशी मॅडम, सावित्राबाई चांडे, सुनिता शिरसाठ, छाया लांडगे, तिलातमा शिंदे, विमल गांगुर्डे, लहानबाई निकम, सुमन बनकर, स्वाती रणवरे सीताबाई दुशिंग, सुमनबाई गांगुर्डे महिला वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते,

# खुपटी येथे हभप इंदोरीकर महाराजांच्या कीर्तनाला अलोट गर्दी

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील खुपटी येथे चेअरमन पाराजी शिंदे पाटील यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या समाज प्रबोधनकार हभप निवृत्ती महाराज इंदोरीकर यांच्या कीर्तन सोहळ्याला पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कीर्तनाच्या माध्यमातून संत विचार, नामस्मरण आणि अध्यात्मिक जीवनाचे महत्त्व सांगत इंदोरीकर महाराजांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना इंदोरीकर महाराज म्हणाले की, संत हे वारकरी संप्रदायाचा प्राण असून आई-वडील, संत, ग्रंथ आणि भगवंत यांच्यातच जगाला सुखी करण्याची ताकद आहे. जीवनात नामचिंतन करत जगणे हाच खरा स्वर्ग असल्याचे त्यांनी सांगितले. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या कार्याचा गौरव करत ज्ञानेश्वरी हा विद्वानांचा विषय असून तिच्या माध्यमातून मानवजातीला जीवनाचे सार मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. मूर्खांच्या हाती पैसा व सत्ता गेल्यामुळे समाजातील सुज्ञ लोकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगत त्यांनी चांगल्या कर्माचे महत्त्वही पटवून दिले. जीवनात परमार्थ आणि संत विचार जोपासल्याशिवाय माणूस सुखी होऊ शकत नाही, असेही ते म्हणाले. याप्रसंगी पाराजी शिंदे यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त इंदोरीकर महाराजांच्या हस्ते त्यांचा श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

# जवाहर विद्यालयात योगदिवस



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**चांदा :** नेवासा तालुक्यातील चांदा येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आर्ट ऑफ लिव्हिंगचे तुकाराम मुरलीधर जावळे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व आर्ट ऑफ लिव्हिंग टीमचे सौ.मंजुषा सुभाष गडाख ,श्री सुभाष गडाख, श्री अविनाश जगदाळे, श्री शिवाजी कराळे यांच्या प्रमुख उपस्थितीत योग दिन उत्साहात साजरा झाला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य अंशुमन वाकचौरे, उपप्राचार्य रघुनाथ भोजने, पर्यवेक्षक राजेश शेंडगे, उच्च माध्यमिक विद्यालय समन्वयक प्रा. भाऊसाहेब तांबे, प्रा. रावसाहेब राशिनकर, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष किरण जावळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती स्वाती दळवी, श्रीमती रुक्मिणी सोनवणे, श्रीमती अनिता भांड -राशिनकर, श्रीमती युवरा गायकवाड, श्रीमती फरिदा पठाण, सौ अश्विनी दहातोंडे, ज्येष्ठ शिक्षिका अर्चना निराळे, श्रीमती शरयू मरडे, ज्येष्ठ शिक्षक हरीश दगडखैर, जालिंदर शेटे, बबन घोडे,राजेंद्र पाठक, सिराज शेख,संदीप शेंडगे,दीपक निमसे, स्वप्निल मालवंडे, प्रवीण कार्ले, संदीप कासार,रोशन सरोदे,प्रा. भगवान भाबड,प्रा. संदीप बुचकूल, प्रा.भाऊसाहेब पानसरे, प्रा. दिलीप ससे, प्रा. रंजना काकड यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी योग दिनात उत्स्फूर्त सहभाग घेत विविध योगासने, सूर्यनमस्कार व प्राणायाम प्रात्यक्षिके सादर केली यावेळी इयत्ता पाचवी ते बारावीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.क्रीडा शिक्षिका दीपिका राक्षे यांनी सूत्रसंचालन केले. ज्येष्ठ शिक्षक संजय ढेरे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला व उपस्थितांचे आभार मानले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय-कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक: करण बाबासाहेब नवल RNI No. MAHM-R/2019/82605 www.rashtrasahyadri.com owner publisher Printer Kakasaheb Babasaheb Nawale To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur, Dist., Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: Karan Babasaheb Nawale RNI No M-HM-R/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmailD- rashtrasahyadrigmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

द•ख•ल

## श्रीरामपूर शहरात पोलिसांचे पथसंचलन



**श्रीरामपूर** : शहरातील प्रमुख रस्त्यावरून गोंधवणी ते श्रीरामपूर पोलिसांनी जोरदार पथसंचलन मंगळवारी सादर केले. उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर, पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांच्यासह पथकात अधिकारी सहभागी झाले होते. जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का एम सुदर्शन, श्रीरामपूर अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे पथसंचलन पोलीसांचे शक्तिप्रदर्शन मोहरम आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पथसंचलन पार पडले.

## स्मार्ट मीटरविरोधात जनआदोलन उभारण्याचा शिवसेनेचा इशारा

**पुणतांबा** : राहाता तालुक्यातील पुणतांबा येथ स्मार्ट मीटरामुळे घरगुतीधारकाना व वाढीव बिलाचा फटका नागरिकांना बसत आहेत.अन्यथा स्मार्ट मीटर स्वताहुन काढुन त्याची पुणतांबा वीज महावितरण सब स्टेशन समोर सामुहिक होळी करण्यात येईल असा इशारा शहर शिवसेनेचे वतीने देण्यात आला आहेत. जनतेवर लादलेले स्मार्ट मिटर डोकेदुखी ठरत आहेत. यावेळी, शिवसेनेचे शैलैश गगे यांनी सबस्टेशन जावून अधिकाऱ्याला धारेवर धरले होते.

## संदीप पुंड यांच्या यशा बद्दल पिपाडांकडून सत्कार



**शिर्डी** : राहाता येथील संदीप पुंडलीक पुंड यांनी वकिलीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल राहाता नगरपालिकेच्या प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा ममता पिपाडा आणि भाजपा नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी आरपीआयचे नेते दिलीपराव वाघमारे उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. पिपाडा म्हणाले की, ग्रामीण भागातील युवकांनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे अँड. संदीप पुंड होय. त्यांनी अथक परिश्रम, अभ्यासू वृत्ती आणि कायद्याचा सखोल अभ्यास यांच्या बळावर हे यश मिळविले आहे. त्यांच्या यशामुळे राहाता शहरासह गणेश परिसराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## रक्तदान शिबिरात ५१ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग




**नेवासा** : महेश नवमी उत्सवानिमित्त सकल माहेश्वरी समाज नेवासा तालुका यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समाजोपयोगी उपक्रम म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला महिला व युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत एकूण ५१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. या शिबिरात संकलित करण्यात आलेले रक्त अहिल्यानगर येथील जनकल्याण रक्त केंद्राच्या ब्लड बँकेस सुपूर्द करण्यात आले. माहेश्वरी समाजाचे जिल्हा संयुक्त मंत्री बाळासाहेब सिकची यांनी या शिबिरासाठी पुढाकार घेतला. नेवासा तालुका अध्यक्ष संदीप अट्टल,सचिव ओंकारनाथ बंग तसेच माहेश्वरी युवा संघटनेचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.यावेळी रक्तदात्यांचा सन्मान करण्यात आला.

# आ. प्राजक्त तनपुरे यांनी विधान परिषद सदस्यत्वाची घेतली शपथ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून बिनविरोध निवडून आलेले माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी मुंबईतील विधान भवनात विधान परिषद सदस्य म्हणून पद व गोपनीयतेची शपथ घेतली.

शपथविधीनंतर त्यांनी अधिकृतपणे आमदारकीची सूत्रे स्वीकारली असून राहुरी, नगर आणि पाथर्डी मतदारसंघात कार्यकर्ते व नागरिकांनी आनंदोत्सव साजरा केला. प्राजक्त तनपुरे यांच्या विधान परिषदेवरील निवडीमुळे राज्याच्या विधिमंडळात अभ्यासू व प्रभावी नेतृत्वाची भर पडल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. आमदार म्हणून त्यांनी यापूर्वी रस्ते, पाणीपुरवठा, सिंचन, वीज आणि औद्योगिक विकासाच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केला होता.

त्यामुळे त्यांच्या पुनरागमनामुळे मतदारसंघाच्या विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतरही तनपुरे यांनी मतदारसंघाशी संपर्क कायम ठेवत विविध विकासकामांसाठी प्रयत्न सुरू ठेवले. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना विधान परिषदेसाठी उमेदवारी देण्यात आली आणि ते बिनविरोध निवडून आले.

मंत्रीपदाच्या कार्यकाळात त्यांनी अनेक प्रलंबित विकासकामे मार्गी लावत मोठा निधी उपलब्ध करून दिला होता. त्यामुळे पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, सिंचन व रस्ते यांसारख्या प्रश्नांवर आता अधिक प्रभावीपणे पाठपुरावा होईल, असा विश्वास नागरिक व्यक्त करीत आहेत. त्यांच्या शपथविधीची बातमी समजताच मतदारसंघात ठिकठिकाणी जल्लोष करण्यात आला.

## आ. अक्षय कर्डिलेंनी घेतली पद व गोपनीयतेची शपथ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : राहुरी -पाथर्डी -नगर विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत विक्रमी मताधिक्यांनी विजयी झालेले भाजपचे नवनिर्वाचित आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांनी मुंबई येथील विधानभवनात आमदारकीची व गोपनीयतेची शपथ घेतली. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनास प्रारंभ होताच अक्षय कर्डिले यांनी आमदार म्हणून अधिकृत शपथ घेत आपल्या विधिमंडळातील कारकिर्दीची सुरुवात केली. शपथविधीनंतर भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समर्थकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिलेंच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाली होती.

त्यानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपने शिवाजीराव कर्डिले यांचे सुपुत्र अक्षय कर्डिले यांना उमेदवारी दिली होती. या निवडणुकीत अक्षय कर्डिले यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार गोविंद मोकाटे यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव करत दणदणीत विजय मिळविला होता.

राहुरी मतदार संघातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावणे, विकासकामांना गती देणे आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणींवर तत्काळ सोडविण्याचा प्रयत्न करणे, यावर आपला भर राहणार असल्याचे कर्डिले समर्थकांकडून सांगण्यात येत.

## भाजपच्या अहिल्यानगर उत्तर जिल्हा उपाध्यक्षपदी सचिन शिंदे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील रहिमपूर येथील विखे परिवाराचे एकनिष्ठ कार्यकर्ते व भाजपचे खंदे समर्थक सचिन रघुनाथ शिंदे यांची भारतीय जनता पक्षाच्या अहिल्यानगर उत्तर जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजप उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन सुरेश दिनकर यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली. युवक संघटन, पक्षवाढ आणि सामाजिक कार्यातील योगदानाची दखल घेऊन शिंदे यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आल्याचे सांगण्यात आले. सचिन शिंदे यांनी युवक वर्गाची मोठी एकजूट निर्माण करत पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

तसेच रहिमपूर परिसरातील विविध विकासकामे मार्गी लावण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा केला. महिला बचत गटांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, सामाजिक उपक्रम राबविणे तसेच आदिवासी समाजासाठी विविध मेळावे व जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. या निवडीबद्दल डॉ. राधाकृष्ण विखे, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे, भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे, आ. अमोल खताळ, धनश्री विखे यांच्यासह विविध मान्यवरांनी सचिन शिंदे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## रस्ता कामाच्या संदर्भात नेवासा फाटा येथे रस्तारोको



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासा तालुक्यातील म्हसले,मक्तापुर गोंडेगाव रस्त्याच्या दुर्लक्षित कामाच्या संदर्भात नेवासा फाटा येथे राजमाता अहिल्यादेवी चौकामध्ये मराठा सुकाणू समितीचे प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे यांच्या मार्गदर्शनाखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात आले या आंदोलनात वरील तिन्ही ही गावातील ग्रामस्थ सहभागी झाले होते. यावेळी बोलतांना मराठा सुकाणू समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे म्हटले की गेल्या अनेक दिवसापासून मक्तापूर- म्हसले रस्त्याचे कामे मंजूर होऊन ही काम पूर्ण होत नव्हते या रस्त्यामध्ये अनेक अपघात होऊन त्यांनी आपले जीव गमावले सध्याला केंद्र सरकार व राज्य सरकार ५०-५० कोटी रुपयाला आमदार, खासदार विकत घेता मात्र सर्वसामान्य लोकांना रस्ता जायला नाही त्याकडे दुर्लक्ष केले जाते,या रस्त्याच्या कामाला गती द्यावी लवकरात लवकर या रस्त्याचा काम पूर्ण करावे अन्यथा आंदोलन तीव्र केले जाईल असा इशारा यावेळी बोलतांना दिला.

यावेळी झालेल्या रस्ता रोको आंदोलन प्रसंगी सरपंच कविता किशोर शिरसाठ, माजी सरपंच पुनमचंद साळवे, बाबासाहेब शिरसाठ,अमोल शिरसाठ,सचिन गव्हाणे, शहाजी शिरसाठ,योगेश भरत पवार,रामेश्वर नवले अमोल शिरसाठ,भानुदास शिरसाठ, अनिल गोरे यांच्यासह मक्तापूर, म्हसले, गोंडेगाव येथील ग्रामस्थ उपस्थित होते. नेवासा पोलीस स्टेशनचे प्रताप दराडे व पोलिस पाटील आदेश साठे यांच्या प्रयत्नामुळे काम सुरू करण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले रस्ता कामाला सुरुवात केली जाईल, गती दिली जाईल, या आश्वासनंतर रस्तारोको मागे घेण्यात आला. युवा नेते गणेश झगरे यांनी उपस्थित अधिकारी व पदाधिकारी यांना ग्रामस्थांच्या वतीने धन्यवाद देत आभार मानले.

## विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा : गीतांजली शेळके

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**साकूर** : शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. एआय तंत्रज्ञानाच्या मदतीतून बौद्धिक विकासाबरोबर संगीत गाणे, आधुनिक तंत्रज्ञानाची पद्धत शालेय विद्यार्थ्यांनी आत्मसात करून ती बौद्धिक विकासाची अधिक आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे मत जी.एस.महानगर बँकेच्या अध्यक्ष व जिल्हा बँकेच्या संचालिका गीतांजली शेळके यांनी सागितले.पारनेर तालुक्यातील मांडवे खुर्द जिल्हा परिषद प्राथमिक डिजिटल शाळेला नुकतीच भेट दिली असता, त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी, अहिल्यानगर जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड. सहाय्यक निबंधक विशाल दाते, पारनेर तालुका विकास अधिकारी प्रभाकर लोळगे, मुंबई जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष सुभाष खणकर उपस्थित होते.यावेळी शेळके यांनी शाळा नवीन खोल्यांची पाहणी केली.अतिशय उत्कृष्ट अशी शाळेची इमारत त्यावर केलेले सुंदर असे आखीव रेखीव नक्षीकाम डिजिटल बोर्ड पाहून त्या भारावून गेल्या, मुलांना खेळण्यासाठी गार्डन विविध फुलांची फळांची झाडे पाहून त्यांनी शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ यांचे कौतुक केले. जी एस महानगर बँकेच्या वतीने शैक्षणिक कर्ज तसेच महिलांसाठी नऊ टक्के व्याजदराने बचत गटासाठी कर्ज देण्याची आश्वासन दिले. त्यानंतर त्यांनी पहिली ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी २०० वह्यांचे वाटप केले व शाळेसाठी लागेल, ती मदत जीएस महानगर बँकेच्या वतीने करण्यात येणार असल्याचे आश्वासन दिली.मांडवे गावातील मातीत आल्यानंतर येथील शेतकरी आनंदी असून समाधानाने आपले जीवन जगतात येता मला खरोखर अभिमान आहेत. यावेळी, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य शिक्षक शिक्षिका कर्मचारी वृंद यांसह ग्रामपंचायत आजी माजी सरपंच उपसरपंच सदस्य तसेच सोसायटीचे आजी माजी चेअरमन व्हाईस चेअरमन सचिव संचालक मंडळ व ग्रामस्थ व तरुण मित्र मंडळ कार्यकर्ते उपस्थित होते.

## मंडळ अधिकाऱ्याच्या नावाने लाच मागणारा एसीबीच्या जाळ्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) संगमनेर तालुक्यात धडक कारवाई करत मंडळ अधिकाऱ्याच्या नावाने ५ हजार रुपयांची लाच मागून स्वीकारणाऱ्या एका खाजगी इसमाला रंगेहात पकडले.

या कारवाईमुळे महसूल विभागासह परिसरात खळबळ उडाली असून आरोपीविरुद्ध संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नितीन किसन खर्डे (वय २९, रा. चंदनापुरी झोळे, ता. संगमनेर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तक्रारदार जेसीबीच्या सहाय्याने शेतजमिनी सपाटीकरणाचे काम करतात.

हे काम कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरू राहावे तसेच प्रशासनाकडून त्रास होऊ नये यासाठी मंडळ अधिकाऱ्याकरिता ५ हजार रुपयांची लाच देण्याची मागणी आरोपीने केली होती. रक्कम न दिल्यास अवैध गौण खनिज उत्खननाचा गुन्हा दाखल करण्याची धमकीही दिली होती. तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार दाखल केल्यानंतर १९ जून रोजी पडताळणी करण्यात आली. लाचेची मागणी सिद्ध झाल्यानंतर २२ जून रोजी सापळा रचण्यात आला. ठरल्याप्रमाणे ५ हजार रुपयांची रक्कम स्वीकारत असताना आरोपीला रंगेहात पकडण्यात आले. पोलीस अधीक्षक भारत तांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने एक दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

## श्रीरामपूर नगरपालिकेत मुख्याधिकारी नसल्याने कामकाजात अडचणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : नगरपालिका मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी (दि.१८) जुन रोजी बदली असून त्या दिवसापासूनच पाच दिवस झालेतरी, प्रभारी मुख्याधिकारी श्रीरामपूर पालिकेला अजून मिळाला नाही.त्यामुळे श्रीरामपूर नगरपालिका पोरकी झाली असून त्वरीत मुख्याधिकारी पदी नियुक्ती करावी, अशी मागणी स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमित मुथा यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री यांच्याकडे केली. मुथा यांनी म्हटले आहे की, श्रीरामपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांची (दि.१८) जून रोजी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात बदली झाली. त्या दिवसापासून ५ दिवस झाले. तरी, श्रीरामपूर नगरपालिका कामकाज पाहण्यासाठी मुख्याधिकारी पदी कोणाचीच नियुक्ती झालेली नाही. साधे प्रभारी मुख्याधिकारी सुध्दा नियुक्त नाहीत. नगराध्यक्ष सहीचे अधिकार काढले असल्यामुळे कामकाजात अडचणी निर्माण होत आहेत. तसेच श्रीरामपूर नगरपालिका ही 'ब' दर्जाची असून तिचे कार्यक्षेत्र मोठं असल्याने तातडीने पूर्ण वेळ मुख्याधिकारी नियुक्त करणे गरजेचे आहे.पालिकेला वाढीव घरपट्टी बाबत निर्णय घेण्यासाठी पुर्णवेळ सक्षम मुख्याधिकारीची गरज असून मुख्याधिकारी पदी त्वरीत नियुक्ती करावी, असे मुथा यांचे म्हणणे आहे.

## स्मार्ट मीटरची सक्ती केल्यास महावितरणविरोधात उग्र आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : स्मार्ट मीटर बसविण्याची ग्राहकांवर सक्ती केल्यास महावितरणविरोधात उग्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन यांनी दिला आहेत.विविध राजकीय पक्ष, व्यापारी संघटना आणि सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता हिरालाल राजपूत यांना घेरावा घालून निवेदन सादर केले. यावेळी मर्चंट असोसिएशनचे माजी अध्यक्ष गौतम उपाध्ये, शिवसेना तालुकाध्यक्ष संतोष डहाळे, राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष अमोल साबणे, मनसे शहराध्यक्ष सतीश कुदळे, बहुजन टायगर फोर्सचे अध्यक्ष संजय रूपटक्के, माजी नगरसेवक मुक्तार शहा, राष्ट्रीय जनसेवा पार्टीचे जिल्हाध्यक्ष तेजस गायकवाड तसेच सामाजिक कार्यकर्ते लकी सेठी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, महावितरणने खाजगी कंपनीमार्फत स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सुरू केले असून अनेक ठिकाणी ग्राहकांच्या इच्छेविरुद्ध ही मोहीम राबवली जात आहे. याशिवाय, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर वीजवाहिन्यांना अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या त्वरित छाटण्याची मागणीही करण्यात आली. वीजपुरवठा खंडित झाल्यास संबंधित वायरमनने ग्राहकांना वेळोवेळी माहिती देणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.सध्या अनेक ठिकाणी वायरमन नागरिकांचे फोन उचलत नसल्याने तसेच वीज कधी सुरू होणार याबाबत कोणतीही माहिती देत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. महावितरण प्रशासनाने या मागण्यांवर तातडीने कार्यवाही न केल्यास सर्वपक्षीय महावितरण च्या कार्यालयावर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल,असा इशारा आंदोलकांनी दिला आहे.


**नावात बदल**

माझे पहिले नाव **अजयकुमार वसनजीभाई तेजनी** आणि आताचे नाव नवीन नाव बदलुन **अजय वसनजीभाई तेजनी** असे आहे. आधार कार्ड नं.७२०५९७२२४१०१ आधारकार्डप्रमाणे व श्रीरामपूर नोटरी पब्लिक समोर नोटरी केलेली आहे.

दि.२०/०६/२०२६


# देवळाली प्रवरा जिल्हा बँकेतील महिला रोखपालच्या बदलीची मागणी

## अन्यथा शाखेला टाळे ठोकण्याचा ग्राहकांचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील जिल्हा सहकारी बँकेच्या शाखेत ग्राहकांना, विशेषतः महिला व ज्येष्ठ नागरिकांना अपमानास्पद वागणूक मिळत असल्याच्या तक्रारींनी गंभीर स्वरूप धारण केले आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने संतप्त ग्राहकांनी संबंधित महिला रोखपाल (कॅशिअर) यांची तात्काळ बदली करण्याची मागणी केली आहे.

मागणी मान्य न झाल्यास शाखेला टाळे ठोकण्याचा इशाराही देण्यात आला आहे. ग्राहकांच्या म्हणण्यानुसार, काही महिन्यांपूर्वी नियुक्त झालेल्या महिला रोखपालांकडून खातेदारांशी उद्धट व अपमानास्पद वर्तन केले जात आहे. किरकोळ व्यवहारांसाठी तासन्तास थांबवणे, ज्येष्ठ नागरिक व महिलांना विनाकारण अडवणे, कामकाजात विलंब करणे तसेच चलन भरताना झालेल्या चुका दाखवून अपमानास्पद भाषेत बोलणे, असे प्रकार वारंवार घडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

देवळाली प्रवरा परिसरातील शेतकरी, महिला बचत गट, संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या प्रमाणावर खाती या शाखेत आहेत. त्यामुळे दररोज मोठ्या संख्येने ग्राहक शाखेत येत असतात. मात्र संबंधित कर्मचाऱ्यांच्या वागणुकीमुळे ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. जॉन संसारे, नानासाहेब कदम, आप्पासाहेब ढुस, सोपान चौधरी यांच्यासह विविध सोसायट्या व पतसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा बँकेचे कार्यकारी संचालक रावसाहेब वर्पे यांच्याकडे लेखी व दूरध्वनीद्वारे तक्रारी केल्याचे सांगितले आहे. अनेक तक्रारींनंतरही कारवाई न झाल्याने ग्राहकांमध्ये संताप वाढत आहे.

### शाखाधिकारी ते रोखपाल!

ग्राहकांच्या दाव्यानुसार, संबंधित महिला कर्मचारी यापूर्वी तांदुळवाडी शाखेत शाखाधिकारी म्हणून कार्यरत होत्या. तेथील ग्राहकांच्या तक्रारीनंतर चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर त्यांची शाखाधिकारी पदावरून बदली करून देवळाली प्रवरा येथे रोखपाल म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. आता येथेही ग्राहकांकडून तक्रारी वाढत असल्याने त्यांची ग्राहकांशी थेट संबंध येणार नाही अशा ठिकाणी बदली करण्याची मागणी होत आहे.

### संबंधित कर्मचाऱ्यांना समज दिली जाईल - दुधाळ

या प्रकरणाबाबत विचारणा केली असता राहुरी तालुका विकास अधिकारी संजय दुधाळ यांनी संबंधित महिला कर्मचाऱ्यांना ग्राहकांशी सौजन्याने वागण्याबाबत समज दिली जाईल, असे सांगितले.

### तालुका विकास अधिकाऱ्यांकडे तक्रार करा - वर्पे

जिल्हा बँकेचे कार्यकारी संचालक रावसाहेब वर्पे यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या तक्रारी राहुरी तालुका विकास अधिकाऱ्यांकडे कराव्यात. तालुका स्तरावरील अधिकारी संबंधित बाबींची दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही करतील, असे त्यांनी स्पष्ट केले.


**जाहिर समन्स**

अ‍ॅड. जी.जी. गुरसळ,
कोपरगांव कोर्ट, कोपरगाव

शिर्डी येथील मे उपविभागीय अधिकारी भाग शिर्डी यांच्या कोर्टात...
समन्स(दिवाणी प्रक्रिया संहिता कमांक ५ नियम ३)
ने.ता.२२/०७/२०२६
अपिल अर्ज नं. २९०/२०२५

निशाणी कं.
बाळासाहेब भागाजी भाबड व इतर ... अपेलंट
विरूध्द
नंदा नितीन कोद्रे व इतर ... रेस्पॉडण्टस
प्रति,

रेस्पॉडण्टस नं. ८) भरत जनार्दन रासकर ९) सन्मीत जनार्दन रासकर १०) सौ. संगिता सुरेंद्र गिरमे ११) सौ बनिता जनार्दन रासकर १५) सरूबाई द्वारकानाथ शिंदे १७) प्रमिला लक्ष्मण शिंदे १९) प्रदिप लक्ष्मणराव शिंदे वर नमूद रेस्पॉडण्टस यांचे विरुध्द या न्यायालयात अपिल / डिले चौकशी अर्ज नं. २९०/२०२५ दाखल केले आहे. म्हणून सदर अपिलाच्या संबंधात आपले म्हणणे मांडण्यासाठी दिनांक २२/०७/२०२६ रोजी सकाळी ११.१५ वाजता या न्यायालयात आपण जातीने किंवा ज्यास यथायोग्य सुचना दिलेल्या असुन जो वादासंबंधीचे सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणारी व्यक्ती त्यांच्याबरोबर असेल अशा वकिलांमार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलाविण्यात येत आहे व तुमच्या हजेरीसाठी ठरवलेला दिवस वादाच्या अंतिम निर्णयासाठी नेमलेला दिवस असल्यामुळे तुमच्या बचावाच्या पुष्टयर्थ तुम्ही ज्या साक्षीदाराच्या साक्षीचा व ज्या दस्तऐवजाचा आधार घेवु इच्छितो ते सर्व दस्तऐवज त्या दिवशी हजर करण्याची तुम्हाला तयारी ठेवावी लागेल.

तरी तुम्हाला या जाहिर समन्स / नोटिस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिवशी दिनांक २२/०७/२०२६ रोजी सकाळी ११.१५ वाजता या न्यायालयात हजर न रहिल्यास तुमच्या गैरहजेरीत वादाची सुनावणी होवुन निर्णय दिला जाईल, याची दखल घ्यावी.

आज दिनांक २२/०६/२०२६ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे हे जाहिर समन्स.

शिक्का

सही
हुकुमावरुन
उपविभागीय अधिकारी

पान १ वरून

## १२३ केंद्रप्रमुख पदोन्नतीसाठी २९५ शिक्षकांची उडाली धावपळ

१२३ पदांसाठी २९५ पात्र उमेदवारांमध्ये स्पर्धा असताना प्रशासनाने दाखविलेल्या या घाईगडबडीमुळे शिक्षकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुमारे सव्वादोनशे शिक्षक या प्रक्रियेसाठी हजर राहिले. त्यातील १२३ जणांना नियुक्ती देण्यात आल्या. गुणांनुक्रमांक १३३ पर्यंत नियुक्त गेल्या. त्यातील १० जण अनुपस्थित होते की त्यांनी नियुक्ती नाकारली? हे समजू शकले नाही. महिनाभर रखडलेली प्रक्रिया अचानक काही तासांत वेगाने पुढे नेण्यामागील कारणांबाबतही शिक्षण वर्तुळात विविध चर्चा रंगू लागल्या आहेत. मर्जीतील शिक्षकांना अपेक्षित नियुक्त देण्यासाठी ही घाई गडबड केली का? असाही सवाल काही शिक्षकांनी उपस्थित केला आहे. एकूणच, महिनाभर प्रतीक्षा आणि काही तासांची तयारी अशी परिस्थिती निर्माण झाल्याने केंद्रप्रमुख पदोन्नतीची प्रक्रिया सध्या जिल्हाभर शिक्षकांमध्ये चर्चेचा विषय ठरली आहे. दरम्यान या संदर्भात जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र संपर्क होऊ शकला नाही.

## भीषण अपघातात पती-पत्नी जागीच ठार

पारनेरकडे जात होते. दरम्यान, सकाळी सुमारे ११.५० वाजण्याच्या सुमारास कन्हेर ओहोळ परिसरात त्यांच्या दुचाकीच्या पाठीमागून येणाऱ्या काँक्रीट मिक्सर (क्र. एमएच-१६ सीडी-९१५०) वाहनाने स्कुटी मोपेडला जोराची धडक दिली. ही धडक इतकी जबरदस्त होती की या धडकेनंतर कांबळे दाम्पत्याची दुचाकी रस्त्याच्या बाजूला कोसळली. त्यानंतर दोघेही काँक्रीट मिक्सरच्या मागील चाकाखाली आल्याने त्यांच्या डोक्याला, छातीला तसेच हात-पायांना गंभीर दुखापती झाल्या. या अपघातात कांबळे पती-पत्नीचा गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी विजय आलेसराव आरसुड (रा. सुपा) यांनी पारनेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, ते स्वतःही पारनेर येथे जमीन खरेदीच्या कामासाठी येत असताना कन्हेर ओहोळ येथे अपघातस्थळी पोहोचले. तेव्हा रस्त्यावर मोठी गर्दी जमलेली होती. घटनास्थळी उभी असलेली स्कुटी पाहून त्यांनी ती भिमराव कांबळे यांची असल्याचे ओळखले. त्यानंतर मृतांमध्ये गौरी कांबळे यांची ओळख पटली. दुसऱ्या मृत व्यक्तीची अवस्था अत्यंत गंभीर असल्याने ओळख पटविणे कठीण होते; मात्र तो भिमराव कांबळे असल्याचे नंतर स्पष्ट झाले. फिर्यादीनुसार, काँक्रीट मिक्सर चालकाने रस्त्यावरील परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालविले. धडक दिल्यानंतर चालकाने वाहन न थांबवता तसेच जखमींना कोणतीही मदत न करता घटनास्थळावरून निघून गेल्याचा आरोप करण्यात आला या घटनेमुळे सुपा परिसरात शोककळा पसरली असून कांबळे दाम्पत्याच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त केली जात आहे. पारनेर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## राष्ट्रपती पदकाची अब्रू वेशीवर!

नोकरी किंवा कोणताही व्यवसाय करता येणार नाही. जर त्यांनी असा प्रयत्न केला, तर त्यांचा उदरनिर्वाह भत्ता बंद करून त्यांच्यावर वेगळी कारवाई केली जाईल. तसेच त्यांना अहिल्यानगर पोलीस मुख्यालयात दररोज हजेरी लावण्याचे आणि दर शुक्रवारी कवायत मैदानावर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## महाराष्ट्रातील सात दिग्गजांना पद्म पुरस्कारांचा बहुमान

समारंभाला उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते. पद्म पुरस्कार वितरणाच्या या टप्प्यात देशभरातील ६५ जणांना सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्रातील या सातही मान्यवरांच्या कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतल्याने राज्यभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

## विकास निधी शिल्लक ठेवून स्वतःच्याच विकासासाठी बंडखोरी..?

मूल्यमापन पाच वर्षांच्या कालावधीनंतर करावे. २०१९ ते २०२४ या कार्यकाळात मला मिळालेला संपूर्ण निधी खर्च झाला असून एकही रुपया शिल्लक नाही. एमपीलॅडच्या अधिकृत संकेतस्थळावर ही माहिती उपलब्ध आहे, असे स्पष्ट केले. लोकसभा निवडणुकीनंतर झालेल्या या राजकीय भूकंपात विकास निधीचा मुद्दा केंद्रस्थानी आला असला, तरी प्रत्यक्षात मंजूर निधी आणि त्याच्या वापरातील तफावत आता या बंडखोर खासदारांसाठीच राजकीय अडचणीची ठरण्याची चिन्हे आहेत.

शिल्लक निधीत आघाडी कोणाची?
भाऊसाहेब वाकचौरे (शिर्डी) ₹१३.९८ कोटी
संजय जाधव (परभणी) ₹१०.९१ कोटी
नागेश पाटील आष्टीकर (हिंगोली) ₹१३.९५ कोटी
संजय देशमुख (वाशिम) ₹१७.१४ कोटी
ओमराजे निंबाळकर (धाराशिव) ₹१६.४९ कोटी
संजय दिना पाटील (ईशान्य मुंबई) ₹१४.५४ कोटी

# तुम्ही जावा तुमच्या गावा आमचा राम राम घ्यावा

## शिर्डीचे मुख्याधिकारी दिघे यांचे विषयी कटूता

**अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : गेल्या दहा वर्षांपासून शिर्डी नगर परिषदचे मुख्याधिकारी म्हणून पदभार सांभाळणारे सतिश दिघे यांना आता शिर्डीची जनता उबगली असल्याचे काल भूमिगत चारीच्या मुद्द्यावरून दिसून आले आहे त्यांचेवर सडकून टीका झाल्याने त्यांच्या विरोधात शिर्डीकर असल्याचे दिसून आले आहे. गेल्या दहा वर्षांपासून सतिश दिघे शिर्डी चे मुख्याधिकारी, तसे ते अतिशय शिस्तप्रिय व विखे परिवाराचे विश्वासू अशी त्यांची ओळख त्यांनी दहा वर्षाच्या काळात शिर्डीच्या विकासासाठी अनेक मोठ मोठे प्रकल्प उभे केले त्यांची दूरदृष्टी वाखाणण्याजोगी, जो अधिकारी विखे परिवाराशी जमवून घेतो त्याची खुर्ची पक्की असत हा तालुक्याचा आजपर्यंतचा इतिहास आणि हे गुपीत चाणाक्ष व कुशाग्र बुध्दी असलेल्या दिघे ह्यांनी घेरले व तब्बल दहा वर्षे एकाच ठिकाणी काम करण्यास त्यांना संधी मिळाली.

त्या संधीचे त्यांनी सोने ही केले हे नाकारता येणार नाही. दहा वर्षात सर्वाधिक काळ ते प्रशासक म्हणून राहिल्याने एकहाती सतेच्या चाव्या त्यांच्या हातात होत्या. ही कला जपत त्यांनी वक्तृत्वावर भर देत आपली वकृत्व शैली इतकी पारंगत केली की ते एखाद्या नेत्याच्या भाषणाला लाजवेल इतक्या धारदार व चपलख पणे तासनतास स्टेज गाजवू शकतात इतके तरबेज होण्याची किमया त्यांनी आत्मसात केली. एरव्ही तालुक्यातील प्रशासकीय सेवेत अनेक अधिकारी भाषणा पासून अलिप्त राहून त्या फंदात कुणी पडत नाही . मात्र त्यात दिघे यांनी आपल्या चतुरस्त्र पणा उपयोग करत शिर्डी साठी एक चांगल्या दर्जाचा अधिकारी म्हणून ओळख निर्माण केली आहे.



आता एवढ्या शिस्त प्रिय अधिकाऱ्याला शिर्डी का उबगली याचा शोध घेणे ही तेवढेच महत्त्वाचे आहे. त्यांच्या विरोधात जाहीर ठिणगी पडली ती १२ चारी बंदीस्त करण्याच्या मुद्यावरुन एरवी त्यांच्या विरोधात खासगी रित्या बोलले जायचे परंतू शिर्डीच्या राजकारणात दबदबा असलेले शिर्डी विविध कार्यकारी सोसायटीचे माजी अध्यक्ष आप्पासाहेब कोते यांनी त्यांना थेट शिंगावर घेत चले जाव चा नारा दिला.

तेथूनच दिघे आता नको असा सूर पुढे आला, वास्तवीक १२ चारीचा मुद्दा जरी छोटा असला तरी दिघें च्या बद्दल शिर्डीकरांच्या मनात असलेल्या असंतोषाला वाट मोकळी करून दिली. इतके दिवस प्रशासक राज असल्याने ते म्हणेल ती पूर्व दिशा असायची किंवा जनतेला दिघेंचे न पटल्यास सुजय दादा पर्यंत विषय जायचा व ते समजूत काढत आता निवडणूकी नंतर नगरसेवक निवडतील व तुमचे प्रश्न तिथेच सुटेल असे मार्ग काढत. निवडणूक झाली २३ नगरसेवक एक नगराध्यक्ष विराज मान होवून शंभर दिवस उलटून गेले.

आता नगसेवक आपले प्रश्न पालीकेत मांडतील अशी आशा जनता बाळगून आहे. मात्र नगरसेवकांना मुख्याधिकाऱ्यांना केव्हाही आणि कधीही भेटता येत नाही अशी माहिती खुद्द नगरसेवकांनी बोलून दाखवली आहे. नगसेवक न.प.चे मालक असताना शासनाच्या नोकराला भेटायची वेळ मागावी लागते अशी परिस्थिती आहे. प्रभाग १ मधे सुरु असलेल्या रस्त्याच्या कामात नगरसेवकांचे म्हणणे मुख्याधिकारी यांनी न जुमानल्याने त्याने चक्क डॉ. सुजय विखे यांना दिघे यांची तक्रार केल्याची घटना ताजी आहे. मात्र १२ चारीच्या घटनेमुळे मुख्याधिकारी यांच्या विषयी शिर्डीकरांच्य मनात कटूता निर्माण झाली हे नाकारता येणार नाही. चारीचा मुद्दा शांत असला तरी आतून लागलेली धग कायम आहे.

त्यामुळे शिर्डी करांच्या मनात तुम्ही जावा तुमच्या गावा आमचा राम राम घ्यावा अशी म्हणण्याची वेळ आली आहे.

# डॉ. आबासाहेब शिरसाठ यांना समाजरत्न पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : विश्वकर्मा वंशीय समाज संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित गुणवंतांचा कौतुक सोहळा रविवारी २१ जून रोजी संत नरहरी महाराज मंदिर, बजाजनगर येथे उत्साहात पार पडला. गेल्या अकरा वर्षांपासून संघटनेतर्फे गुणवंत विद्यार्थी तसेच समाजासाठी भरीव योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव केला जातो. भगवान विश्वकर्मा यांच्या पाच वंशांतील सुतार, लोहार, सोनार, तांबट आणि शिल्पकार समाज बांधवांची ही संघटना असून, दरवर्षी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा सत्कार करण्यात येतो. यावर्षी गंगापूरचे डॉ. आबासाहेब शिरसाठ यांना सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'उत्कृष्ट समाजरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संभाजीनगरचे उद्योजक तानाजी शेटे होते.




यावेळी अरुण भालेकर, गोपाळ राऊत, विशाल सुराशे, संजय बोराडे, विलास पवार आणि गणेश गव्हाणे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक आणि समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सोमनाथ महाराज राऊत, केशव सपकाळ, बालाजी पांचाळ, कल्याण घुसळकर, व्यंकट पांचाळ, संतोष भांडेकर, अमोल डोळस, चंदू हिवाळे, पळसकर आदींनी विशेष परिश्रम घेतले. डॉ. आबासाहेब शिरसाठ यांना समाजरत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष वाल्मीक शिरसाठ, समाज संघटनेचे अध्यक्ष सुरेश बोर्डे, विजय बोर्डे, धनराज सोमवंशी, गोविंद सोमवंशी, संजय राऊत, गोरख बोर्डे, राजेंद्र बोर्डे आणि अमोल राऊत यांच्यासह अनेक समाज बांधवांनी त्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुण भालेकर यांनी केले,तर विद्या सुतार यांनी आभार प्रदर्शन केले.

## निधन वार्ता

### सरस्वती बुऱ्हाडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**प्रवरानगर** : लोणी येथील सुवर्णकार समाजातील जुन्या पिढीतील ग. भा. सरस्वती गोविंद बुऱ्हाडे (वय ८५) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले त्यांचे पश्चात दोन मुले, दोन मुली तसेच नातवंडे असा मोठा परीवार असून लक्ष्मण गोविंद बुऱ्हाडे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, मुंबई व प्रवरा शिक्षण संस्था येथे सिक्युरिटी डिपार्टमेंट मध्ये कार्यरत असलेले संजय बुऱ्हाडे यांच्या मातोश्री होत.

### प्रमिला मेहेत्रे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : शहरातील प्रमिला दिनकर मेहेत्रे (वय ७५ वर्ष), यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा एक मुलगी जावई, सुन, नातवंडे असा परिवार असून भारतीय जनता पक्षाचे राहुरी शहर मंडल उपाध्यक्ष सचिन मेहेत्रे यांच्या त्या मातोश्री होत.

## अप्पर तहसील कार्यालय निर्मितीबाबत हरकती सादर कराव्या : तहसीलदार डॉ. बिरादार



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : प्रस्तावित नवीन अपर तहसिल कार्यालयनिर्मिती बाबत आणि क्षेत्रांच्या पुनर्रचनेबाबत नेवासा तालुक्यातील तसेच संबंधित क्षेत्रातील स्थानिक नागरिकांना, संस्थांना काही हरकती किंवा सूचना सादर करावयाच्या असल्यास त्यांनी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून सादर कराव्यात अशी माहिती तहसीलदार डॉ.संजय बिरादार यांनी दिली. सदर प्रस्तावा बाबतच्या हरकती व सूचना या जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांका पासून (पंधरा) दिवसांच्या आत म्हणजेच दिनांक ८ जुलै २०२६ पर्यंत किंवा त्या पूर्वी लेखी स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे.लेखी हरकती सूचना तहसिल कार्यालय नेवासा येथे कार्यालयीन वेळेत समक्ष सादर करता येतील (टपालशाखे मार्फत हरकती व सुचनांचे अर्जावर कार्यवाही होणार नाही) मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार केला जाणार नाही.नागरिकांना त्यांच्या हरकती स्पष्टकारणांसह व आवश्यक पुराव्यांसह (नकाशे किंवा साख्यिकीय माहिती असल्यास) सादर कराव्या लागतील. प्राप्त झालेल्या सर्वहरकती व सूचनांचे दैनंदिन संकलन व तपासणीकरून, स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सदर अहवाल जिल्हाधिकारी अहिल्यानगर व विभागीय आयुक्त नाशिक विभाग यांच्यामार्फत (महसूल व वनविभाग) यांच्याकडे मंजुरीसाठी विनाविलंब सादर केला जाईल अशी माहिती तहसीलदार डॉ.बिरादार यांनी दिली.

## श्रीरामपूर कार्यशाळेतील कर्तव्यनिष्ठ कर्मचाऱ्याच्या कार्याचा गौरव

### सुरेंद्र कसदेकर यांची अमरावती विभागात बदली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या श्रीरामपूर कार्यशाळेतील आयबीएम व इंजिन सेक्शनमध्ये उत्कृष्ट सेवा बजावणारे कर्मचारी सुरेंद्र कसदेकर यांची अमरावती विभागात बदली झाल्याबद्दल रविवारी दुपारनंतर कर्मचारी, अधिकारी व मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. आपल्या सेवाकाळात प्रामाणिकपणा, शिस्त, कार्यतत्परता आणि कर्तव्यनिष्ठेच्या बळावर कसदेकर यांनी कार्यक्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली. विविध तांत्रिक कामांमध्ये त्यांनी दिलेले योगदान तसेच सहकाऱ्यांशी जपलेले स्नेहपूर्ण संबंध याबद्दल उपस्थितांनी त्यांचा गौरव केला.

यावेळी उपस्थितांनी कसदेकर यांच्या कार्यशैलीचे कौतुक करत, त्यांच्या अनुभवाचा आणि कौशल्याचा लाभ अमरावती विभागाला निश्चितपणे होईल, असा विश्वास व्यक्त केला. पुढील सेवाप्रवासासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमास श्रीरामपूर कार्यशाळेतील कर्मचारी, अधिकारी व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संगमनेर तालुक्यातील पीक विमाचा आवाज विधानसभेत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२५ चा पीकविमा अद्याप मिळालेला नसल्याचा गंभीर प्रश्न आ. अमोल खताळ यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात प्रभावीपणे उपस्थित केला.

यावेळी त्यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे लक्ष वेधत तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांना तातडीने पीकविम्याचा लाभ देण्याची मागणी केली. आ. खताळ यांनी सभागृहात मांडलेल्या माहितीनुसार, खरीप हंगाम २०२५ दरम्यान तालुक्यातील अनेक भागांत अतिवृष्टी, अवकाळी पाऊस तसेच इतर प्रतिकूल हवामानामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या नुकसानीमुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला. मात्र कृषी विभागाच्या प्रशासकीय त्रुटी व संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांना अद्याप पीकविम्याचा लाभ मिळालेला नाही. शेतकऱ्यांनी नियमांनुसार विमा भरलेला असतानाही त्यांना हक्काची नुकसान भरपाई मिळाली नसल्याने तालुक्यात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांवर हा अन्याय असल्याचे त्यांनी सभागृहात ठामपणे मांडले. पीकविमा योजनेच्या अंमलबजावणीत झालेल्या त्रुटींसाठी जबाबदार असलेल्या कृषी विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच विमा कंपनीला आवश्यक निर्देश देऊन संगमनेर तालुक्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना तातडीने पीकविम्याची रक्कम वितरित करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी कृषिमंत्री भरणे यांच्याकडे केली.

**CHANGE OF NAME**

I Have Change My Old Name
**Shaikh Ayaan Akram**
( Before Name )
To New Name As
**Ayan Akram Shaikh**
(Aadhar No. 7002 6005 8566)
From Vide Affidavit
Before Notary Public
Kopargaon
Place: Kopargaon
Date : 23/06/2026

# सोयाबीन विमा मंजूर; कापूस उत्पादक शेतकरी अजूनही प्रतीक्षेत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांच्या विमा भरपाईबाबत श्रीरामपूर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये मिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. तालुक्यातील हजारो सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर पीक विम्याची रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली असली, तरी कापूस उत्पादक शेतकरी अद्याप नुकसानभरपाईच्या प्रतीक्षेत असल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. माहितीनुसार, तालुक्यातील ८ हजार ३१९ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर सोयाबीन पीक विम्याची रक्कम मंजूर झाली असून सुमारे १० कोटी ६६ लाख रुपयांचे वितरण करण्यात येत आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, मागील वर्षी सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कापूस पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते.

गोदावरी व प्रवरा नदी परिसरातील भागात कापूस लागवड मोठ्या प्रमाणात असून अनेक शेतकऱ्यांचे पीक अक्षरशः हातातून गेले होते. त्यानंतर नुकसानभरपाई व पीक विम्याच्या आशेवर असलेल्या शेतकऱ्यांना अद्याप अपेक्षित मदत मिळालेली नाही. कापूस उत्पादक शेतकरी तहसील कार्यालय, कृषी विभाग आणि पीक विमा कंपनीकडे सातत्याने पाठपुरावा करत आहेत. मात्र, नुकसानभरपाईची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढत आहे. कृषी विभागाकडून पीक कापणी प्रयोग, प्रत्यक्ष पंचनामे आणि तांत्रिक पडताळणीच्या आधारे नुकसानीचे मूल्यांकन करण्यात आले असून त्याचा अहवाल वरिष्ठ स्तरावर तसेच विमा कंपनीकडे सादर करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. तालुका कृषी विभागाच्या माहितीनुसार, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे दोन पद्धतींनी करण्यात आले आहेत. पीक कापणी प्रयोगातून मिळालेली माहिती आणि उपग्रहाधारित तांत्रिक मोजमाप या दोन्हींच्या आधारे अंतिम नुकसानाचा अंदाज निश्चित केला जातो. संबंधित अहवाल विमा कंपनीकडे पाठविण्यात आला असून पुढील निर्णयाची प्रतीक्षा आहे.

दरम्यान, सोयाबीन विमा मिळाल्याने काही शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असला, तरी कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईचा प्रश्न अद्याप प्रलंबित असल्याने प्रशासनाने याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून होत आहे. श्रीरामपूर तालुक्यातील ८ हजार ३१९ शेतकऱ्यांना सोयाबीन पीक विम्याची रक्कम मंजूर झाली असली, तरी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अद्याप भरपाई न मिळाल्याने त्यांच्यात नाराजीचे वातावरण आहे. प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही निर्णय लांबत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

## पावसाच्या आगमनाने नागरिकांना दिलासा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : शहरात काल पावसाने हजेरी लावल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. जून महिना संपूर्ण संपत आला तरीही पावसाचा शिडकावा सुद्धा झाला नव्हता.काल सकाळपासूनच हवेत मोठ्या प्रमाणात उकाडा होता सकाळपासून दुपारपर्यंत कडक ऊन पडले होते दुपारनंतर आकाशात ढग जमा होण्यास सुरुवात झाली. व दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास पावसाला सुरुवात झाली सुरुवातीला पावसाचा वेग काही मंद होता परंतु त्यानंतर पावसाचा वेग वाढला. व शहरात बऱ्यापैकी पाऊस झाला अचानक आलेल्या या पावसामुळे नागरिकांची मोठी धावपळ उडाली होती. राहुरीच्या नव्या पेठेत पाणी वाहत होते. झालेल्या या पावसामुळे उघड्यापासून त्रस्त झालेल्या नागरिकांना गारव्यामुळे दिलासा मिळाला आहे. आलेल्या या पावसामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून शेतकऱ्यांना सुद्धा थोड्या प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

## जागृती बाठिया सी.ए. उत्तीर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : येथील जागृती रमेश बाठिंया ही इन्स्टीट्युट ऑफ चार्टड अकौटंट या संस्थेने घेतलेल्या सी. ए. परिक्षेत उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाली आहे. ती प्रसिद्ध आडत व्यापारी रमेश बाठिंया व सौ. कविता बाठिंया यांची कन्या तर टॅक्स कन्सल्टंट स्व. सुरेश चंद बाठिया यांची पुतणी आहे. जागृतीचे प्राथमिक शिक्षण सेंट झेविअर्स स्कुल, श्रीरामपूर व ११ वी, १२ वी व बी. कॉम पर्यंतचे शिक्षण पुणे येथे झाले आहे. सी.ए. फौडेंशनचे व फायलनचे क्लासेस पुणे येथे केले. जागृतीला कर सल्लागार स्व. सुरेशचंद बाठिंया व आर्टिकलशिप साठी पुणे येथील किर्तने अँड पंडीत चार्टर्ड अकाऊंट या फर्मचे बहुमोल मार्गदर्शन लाभले सी.ए. होण्यासाठी जागृती बांठिया हिला कर सल्लागर अमोल बाठिंया, आस्था हॉस्पिटलचे डॉ. पियुष बाठिंया व सौरभ बाठिंया यांचे अनमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## कोल्हार खुर्दमध्ये विविध मागण्यांसाठी आमरण उपोषण सुरु



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील कोल्हार खुर्द येथील ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी विविध प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सोमवारपासून गावातच आमरण उपोषण सुरू केले आहे. ग्रामपंचायतीच्या कारभारातील कथित अनियमितता, अपूर्ण विकासकामे आणि पाणीटंचाईच्या प्रश्नांमुळे ग्रामस्थांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. उपोषणकर्त्यांनी दिलेल्या निवेदनात दत्तनगर गावठाण दलित वस्ती तसेच गावातील रस्ता काँक्रिटीकरणाच्या अपूर्ण कामांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. संबंधित रस्त्यांची कामे तात्काळ पूर्ण करण्यात यावीत, अशीही मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, १ नोव्हेंबर २०२५ ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत ग्रामपंचायतीकडे जमा झालेल्या सुमारे १९ लाख रुपयांच्या घरपट्टी व पाणीपट्टी निधीची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. गावात १० ते १० दिवसांनी पिण्याचे पाणी मिळत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, पाणीपुरवठ्याचा प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली आहे. तसेच गावातील घनकचरा व्यवस्थापन व्यवस्था प्रभावीपणे राबविणे, सन २०२३ ते २०२६ या कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर झालेल्या सर्व टेंडर प्रक्रियेची तसेच बांधकाम पुस्तिका कलम २५१ अंतर्गत झालेल्या कामांची निष्पक्ष चौकशी करावी, अशा प्रमुख मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या आहेत. ग्रामपंचायत सदस्य प्रकाश भाऊसाहेब शिरसाठ, दिग्विजय अनिल शिरसाठ, दिलीप शंकरराव कानडे, नितीन जगन्नाथ भोसले यांच्यासह ग्रामस्थांनी हे आमरण उपोषण सुरू केले आहे. यावेळी तनपुरे कारखान्याचे माजी संचालक महेश पाटील,भाऊसाहेब पाटील लोंढे,दीपक पाटील, प्रकाश पाटील, अनिल पाटील, विमल भोसले,बबन शिरसाठ सदानंद शिरसाठ,रंगनाथ गाढे चेतन शिरसाट, धनंजय शिरसाट , दत्ता शिरसाठ आदी उपस्थित होते.

# निलेश लंके प्रतिष्ठानचे तालुकाध्यक्ष भालेकर एलसीबीच्या ताब्यात

## मारहाण, लूट व खंडणी प्रकरणात कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** मारहाण, लूटमार आणि खंडणीशी संबंधित गुन्ह्यातील प्रमुख आरोपी म्हणून शोध घेत असलेल्या निलेश लंके प्रतिष्ठानचे पारनेर तालुकाध्यक्ष सतीश भालेकर यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने अटक केली आहे. या कारवाईमुळे पारनेर तालुक्यासह सुपा एमआयडीसी परिसरात चर्चांना उधाण आले आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, म्हसणेफाटा एमआयडीसी परिसरातील सिलॉन बेव्हरेज कॅन प्रा. लि. कंपनीच्या मानव संसाधन (एचआर) विभागप्रमुखांवर हल्ला करून त्यांची सोन्याची चैन हिसकावून घेतल्याचा आरोप आहे. याप्रकरणी सुपा पोलिस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, कंपनीचे कॉन्ट्रॅक्ट मिळविण्याच्या प्रयत्नात असलेल्या वैभव रामदास रिकामे (रा. गव्हाणवाडी, ता. श्रीगोंदा) याला संबंधित कॉन्ट्रॅक्ट न मिळाल्याने नाराजी होती. त्यानंतर



सतीश भालेकर यांच्या सांगण्यावरून कट रचण्यात आल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे.

रुई छत्रपती फाटा परिसरात एचआर हेड महाडीक यांची दुचाकी अडवून आरोपींनी त्यांना मारहाण केली. तसेच, सुपा एमआयडीसी परिसरात काम करण्यास मज्जाव करण्याच्या उद्देशाने धमकी देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेदरम्यान त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैनही हिसकावून नेण्यात आल्याचा आरोप आहे.

या प्रकरणात काही आरोपींना यापूर्वीच अटक करण्यात आली होती. मात्र सतीश भालेकर फरार असल्याने त्यांचा शोध सुरू होता. अखेर एलसीबीच्या पथकाने त्यांना ताब्यात घेतल्याने तपासाला गती मिळाली आहे. दरम्यान, सुपा व म्हसणेफाटा एमआयडीसी परिसरातील उद्योग व्यवस्थापक आणि व्यावसायिकांना पोलिसांनी आवाहन केले आहे. कॉन्ट्रॅक्टच्या नावाखाली दमदाटी, दबाव, खंडणीची मागणी किंवा अन्य प्रकारचा त्रास होत असल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## द•ख•ल

### जागतिक योग दिनानिमित्तच्या निबंध स्पर्धेस मुदतवाढ

**अहिल्यानगर :** जागतिक योग दिनानिमित्त येथील योग विद्याधाम, कोहिनूर मॉल व श्रीपाद टॉईज फयांच्या संयुक्त विद्यमाने भव्य निबंध स्पर्धा आयोजित केली होती. त्या स्पर्धेसाठी निबंध दि. २० जून पर्यंत जमा करावयाचे होते. ती मुदतवाढ आता ३० जूनपर्यंत वाढविण्यात आली आहे अशी माहिती योग्य विद्या धामचे अध्यक्ष डॉक्टर सुंदर गोरे यांनी दिली. या स्पर्धेसाठी मिडीया पार्टनर आय लव्ह नगर आहे. ही स्पर्धा खुला गट व शालेय गट अशा दोन गटांमध्ये घेतली जात आहे. खुल्या गटासाठी आत्म्याशी मैत्री करण्याचा मार्ग अष्टांग योग, आधुनिक जीवनशैली आणि योग साधना, योग केवळ शारीरिक व्यायाम की जीवन पद्धती व योग-संस्कृतीकडून समृद्धीकडे आणि विज्ञानातून अध्यात्माकडे या विषयावर घेण्यात येत आहे. शालेय गटासाठी निरोगी जीवनाची गुरुकिल्ली - योग, योगाभ्यासाचे आरोग्यासाठी महत्त्व व शालेय जीवनात योगाचे महत्त्व या विषयावर ही स्पर्धा आहे या स्पर्धेसाठी शब्द मर्यादा ४०० ते १००० शब्द ठेवलेली आहे. या स्पर्धेमध्ये मराठी हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये तुम्हाला निबंध लिहिता येतात. विजयी स्पर्धकांना प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिके दिली जाणार आहेत. नाव नोंदणी करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकांना ही बक्षीसे दिले जाणार आहेत. स्पर्धकांनी आपले निबंध आता २० जून पर्यंत योग विद्या धाम कुष्ठधाम रोड येथे जमा करावयाचे आहेत. या स्पर्धेसाठी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.

### अहिल्याबाई होळकर यांचे जीवनकार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा स्तुत्य उपक्रम

**अहिल्यानगर :** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दी वर्षानिमित्त विचार भारती संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवांतर्गत विविध राज्यस्तरीय स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या महोत्सवामध्ये राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि निबंध स्पर्धा यशस्वीरीत्या संपन्न झाल्या असून या स्पर्धांतील विजेत्या स्पर्धकांचा गौरव व पारितोषिक वितरण सोहळा शुक्रवार रोजी सायंकाळी ४ वाजता न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी सुप्रसिद्ध शिवचरित्रकार डॉ. अशोक बांगर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार असून, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य प्रा. डॉ. बाळासाहेब सागडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती स्पर्धाप्रमुख चंद्रकांत तागड यांनी दिली. विचार भारती संस्थेच्या वतीने सर्व स्पर्धक, विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी या पारितोषिक वितरण सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भाजपच्यावतीने शुक्रवारी आमदारांचा सत्कार

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहील्यानगर :** जिल्ह्यातील नवनिर्वाचित आमदारांचा नागरी सत्कार समारंभ शुक्रवार दि.२६जून रोजी भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आला असल्याची माहीती भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दिलीप भालसिंग आणि शहराचे अध्यक्ष अनिल मोहीते यांनी दिली.

नुकत्याच संपन्न झालेल्या राहुरी विधानसभा आणि विधानपरीषदेची निवडणुक संपन्न झाली.राहुरी विधनासभा पोटनिवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे उमेदवार आ.अक्षय कर्डीले मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. विधान परीषदेच्या निवडणुकीत अहील्यानगरचे भूमीपुत्र आणि गेली अनेक वर्षे पक्षाच्या संघटनात्मक कार्यात योगदान देणारे सुनिल कर्जतकर यांची विधान परिषदेचे सदस्य म्हणून निवड झाली. आ. विवेक कोल्हे आ. प्राजक्त तनपुरे यांचीही विधनापरिषद निवडणुकीत बिनविरोध झालेली निवड ही भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक आणि जिल्हयाच्या विकासात्मक वाटचालीला आणि पाठबळ देणारे आहे.

अहील्यानगर जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या वतीने शुक्रवार दि.२६ जूनला दुपारी ३.०० वाजता जिल्हा सहकारी बँकेच्या सहकार सभागृहात जलसंपदा तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि विधान परीषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या उपस्थितीत सर्व नवनिर्वाचित आमदारांच्या नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला असल्याचे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले.

या सत्कार सोहळ्यास जिल्ह्यातील महायुतीच्या सर्व आमदार नगराध्यक्ष आणि नगरसेवक यांना निमंत्रित करण्यात आले असून, या समारंभास महायुतीच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहाण्याचे आवाहन भारतीय जनता पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पारनेरमधून 'मिशन झिरो पेण्डन्सी'चा नारा

## शेतरस्त्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर निर्णायक लढ्याची घोषणा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहील्यानगर :** शेतकऱ्यांच्या हक्काच्या शेतरस्त्यांसाठी सुरू असलेला संघर्ष हा कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून, शेतरस्ते अडवून शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या प्रवृत्तीविरोधात आणि प्रशासकीय त्रुटींमुळे होणाऱ्या अन्यायाविरोधात असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी केले. पारनेर येथील शासकीय विश्रामगृहावर आयोजित शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, शेतरस्ता बंद झाला म्हणजे केवळ एक मार्ग बंद होत नाही, तर त्या शेतकरी कुटुंबाच्या आशा, स्वप्ने आणि भविष्याचा मार्गही अडवला जातो. अनेक शेतकरी अज्ञान, आर्थिक अडचणी आणि न्याय मिळविण्याच्या मर्यादित साधनांमुळे हतबल होतात. शेतात जाण्याचा मार्ग बंद झाल्याने होणारे आर्थिक नुकसान, वर्षानुवर्षे चालणारे वाद आणि त्यातून निर्माण होणारा मानसिक ताण संपूर्ण कुटुंबाला अस्वस्थ करून टाकतो.

पवळे म्हणाले की, अनेक वेळा ही परिस्थिती इतकी गंभीर बनते की शेतकऱ्यांना जमिनी विकाव्या लागतात, नातेसंबंध तुटतात, वाद वाढतात आणि काही दुर्दैवी प्रसंगी आत्महत्या किंवा हत्यांसारख्या घटना घडतात. सरकारसमोर सातत्याने पाठपुरावा करून नकाशावरील रस्ते, प्रलंबित शेतरस्ता प्रकरणे आणि शेतकऱ्यांच्या अडचणी प्रभावीपणे मांडण्यात आल्या. यावेळी विजय दळवी, अ‍ॅड. ओंकार नरसाळे, राहुल गट, नानाभाऊ शिकारे, संजय साबळे, बबन गुंड, भाऊसाहेब वाळूंज, दशरथ वाळूंज, नवनाथ घुले, आहिलु घुले, सुभाष ठुबे, पंढरीनाथ कळोखे, इंद्रभान सकट, राधू दाते, स्वप्निल मगर, जालिंदर तानवडे, कल्पना गट, लक्ष्मी सकट यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# गव्हाणवाडी दरोड्याचा उलगडा लाखोंची रोकड लुटणारी टोळी जेरबंद



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** पुणे-अहमदनगर महामार्गावरील गव्हाणवाडी शिवारात कार चालकाला अडवून बेदम मारहाण करत तब्बल २ लाख ४७ हजार रुपयांची रोकड लुटणाऱ्या टोळीचा बेलवंडी पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत छडा लावत पाच आरोपींना अटक केली आहे. न्यायालयाने आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पनवेल येथील बबन मल्हारी औटी (वय ४५) हे आपल्या मूळ गावी नांदा (ता. आष्टी, जि. बीड) येथे जाऊन परतत असताना २१ जून रोजी पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास गव्हाणवाडी शिवारातील स्वामी समर्थ हॉटेलसमोर लघुशंकेसाठी थांबले होते. यावेळी ६ ते ७ जणांच्या टोळीने त्यांना घेरले. गाडी येथे का थांबवली? असा जाब विचारत वाद घालत आरोपींनी त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

यानंतर आरोपींनी त्यांच्या इनोव्हा गाडीचा दरवाजा उघडून डॅशबोर्डमध्ये ठेवलेली २ लाख ४७ हजार रुपयांची रोकड जबरदस्तीने काढून घेतली. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी औटी यांना त्यांच्या गाडीत बसवून शिरूरच्या दिशेने नेले व तेथे सोडून पळ काढला.जखमी अवस्थेत औटी यांनी ११२ हेल्पलाईनवर संपर्क साधत मदतीची मागणी केली. माहिती मिळताच बेलवंडी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. फिर्यादीच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू असताना गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सुरज अविदास ओहोळ, संकेत रमेश शेळके, शुभम दिलीप गायकवाड, क्षितिज दादासाहेब ओहोळ आणि मयूर तुळशीराम ओहोळ यांना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मोहन गाजरे करीत आहेत. पो.अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पो. अधीक्षक वैभव कलूबरमे व उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली बेलवंडीचे सहा. पो. नि. नंदकुमार सोनवलकर, पा. उ.नि.मोहन गाजरे व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

### पुर्ववैमनस्यातून कोयत्याने हल्ला; चौघांविरुद्ध गुन्हा

**अहिल्यानगर :** तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गांधीनगर भागात एका जुन्या अपघाताच्या वादावरून तरुणावर आणि त्याच्या चुलत भावावर कोयत्याने भीषण हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी प्रसाद नरेंद्र ओव्हळ (वय २९, रा. बोल्हेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ओम देविदास डहाळे, चेतन संतोष सरोदे, यश रावसाहेब शिरसाठ (सर्व रा. अहिल्यानगर) आणि त्यांच्या एका अनोळखी साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रसाद ओव्हळ हे टेम्पो चालक आहेत. २१ जून रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास ते गांधीनगर येथील मदिना मशिदीसमोर राहणाऱ्या आपल्या चुलत भावाला भेटण्यासाठी गेले होते. त्या वेळी आरोपींनी अपघाताची मोटारसायकल थांबवून ठेवल्याच्या कारणावरून वाद घालण्यास सुरुवात केली. या किरकोळ वादाचे रूपांतर मोठ्या भांडणात झाले आणि आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या भावाला अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. भांडण सुरू असतानाच आरोपींनी आपल्या जवळील धारदार कोयता काढून फिर्यादीचे चुलत भाऊ चैतन्य ओव्हळ यांच्यावर आणि फिर्यादीवर हल्ला केला. यामध्ये दोघेही जखमी झाले असून आरोपींनी त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. हल्ला केल्यानंतर आरोपी ओम डहाळे आणि त्याचे साथीदार आपली मोटारसायकल घेऊन घटनास्थळावरून पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार गोपीनाथ गोरडे आणि पोलीस हवालदार गणेश साठे यांनी तपास सुरू केला आहे.

# माहिती अधिकार नियम दुरूस्ती : वकिलांचा एल्गार

## २९ जूनला 'रणगाडा हटाओ सत्याग्रह २०२६' निर्धार बैठक

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत करण्यात आलेल्या नियमांतील दुरुस्त्या मागे घेण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्रभर 'रणगाडा हटाओ सत्याग्रह २०२६' उभारण्याचा निर्धार करण्यासाठी सोमवार, दि. २९ जून रोजी अहिल्यानगर येथील बार रूममध्ये वकिलांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यात येणार असून, ही बैठक बार असोसिएशनचे अध्यक्ष ड. कृष्णा झावरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असल्याची माहिती अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी दिली. माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत होणाऱ्या कार्यवाहीत वकिलांना सहभागी होण्यास प्रतिबंध घालण्यात आल्याचा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला आहे.



गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहाने ब्रिटिश सत्तेला लोकशक्तीची जाणीव करून दिली होती. त्याच धर्तीवर माहिती अधिकाराच्या संरक्षणासाठी उभा राहणारा हा सत्याग्रह महाराष्ट्रातील लोकशाहीप्रेमी जनतेचा ऐतिहासिक एल्गार ठरेल, असा विश्वास वकिलांच्या वतीने व्यक्त केला आहे. या बैठकीसाठी बार असोसिएशनचे उपाध्यक्ष अ‍ॅड. भाऊसाहेब घुले, सचिव अ‍ॅड. विनोद शेटे, सहसचिव अ‍ॅड. अमोल अकोलकर, महिला सहसचिव अ‍ॅड. सारिका झरेकर, खजिनदार अ‍ॅड. वसीम खान, कार्यकारीणी सदस्य अ‍ॅड. प्राजक्ता करांडे, अ‍ॅड. आजिनाथ कर्डिले, अ‍ॅड. महेश कोतकर, अ‍ॅड. प्रमोद खामकर, अ‍ॅड. ज्ञानदेव दाते, अ‍ॅड. अक्षय म्हस्के, अ‍ॅड. शिवाजी शिंदे आदी प्रयत्नशील आहेत.

# घनकचरा ठेकेदारांची बिले आता 'क्यूआर कोड' स्कॅनिंगवर

## राज्य शासनाचा मोठा निर्णय

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महापालिकेसह राज्यातील सर्व 'ड' वर्ग महानगरपालिका आणि नगरपरिषदांमध्ये घनकचरा व्यवस्थापनाचे काम करणाऱ्या ठेकेदारांची बिले आता आयसीटी आधारित प्रणालीतील स्कॅनिंगच्या टक्केवारीनुसार काढली जाणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या नगर परिषद प्रशासन संचालनालयाने याबाबतचे आदेश जारी केले आहेत. मे २०२६ च्या बिलांपासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आयसीटी आधारित घनकचरा व्यवस्थापन प्रणाली अंतर्गत दैनंदिन स्कॅनिंग आणि प्रत्यक्ष उचलला जाणारा घनकचरा यांच्यात सुसूत्रता आणण्यासाठी हा बदल करण्यात आला आहे.

या प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ठेकेदारांचे देयक आता स्कॅनिंगच्या टक्केवारीच्या प्रमाणातच अदा करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

दरम्यान, अहिल्यानगर महानगरपालिकेने शहरातील सुमारे ९० हजार घरे आणि व्यावसायिक आस्थापनांवर क्यूआर कोड लावले आहेत. कचरा गोळा करणारी घंटागाडी जेव्हा एखाद्या घराजवळ येते, तेव्हा त्या गाडीवरील कर्मचाऱ्याला संबंधित घराचा क्यूआर कोड स्कॅन करणे बंधनकारक आहे.

या स्कॅनिंगमुळे कचरा गाडी संबंधित भागात गेली होती की नाही आणि त्या घरातील कचरा उचलला गेला आहे की नाही, याची अचूक नोंद महानगरपालिकेच्या यंत्रणेवर तात्काळ होते. शासनाच्या नव्या आदेशानुसार याच क्यूआर कोड स्कॅनिंगच्या आकडेवारीनुसार बिलाची रक्कम दिली जाणार आहे. त्यामुळे कचरा संकलनाच्या कामात अधिक सुधारणा आणि बिलांमध्ये पारदर्शकता येणार आहे.

# १६ वर्षांपासून फरारी आरोपी अखेर जेरबंद



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तब्बल १६ वर्षांपासून न्यायालयीन प्रक्रियेपासून दूर राहून फरार असलेल्या आरोपीला श्रीगोंदा पोलिसांनी शिताफीने सापळा रचून अटक केली. फरारी आरोपी उद्धव बाळासाहेब जठार (वय ४०, रा. कौठा, ता. श्रीगोंदा) हा आपल्या राहत्या घरी आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना समजली. त्याआधारे पो.नि.संजय ठेंगे यांच्या पथकाने वेशांतर करून परिसरात सापळा रचला. व आरोपीला ताब्यात घेत अटक केली. दीर्घकाळ पोलिसांना गुंगारा देणाऱ्या आरोपीला अखेर जेरबंद केले. याकामी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबुर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि.संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली पो. उ.नि. खिळदकर, पोलीस पथकाने परिश्रम घेतले.

# मतभेद विसरून माहेश्वरी समाजाने संघटित व्हावे : श्रीकांत जाजू

**अविनाश मंत्री। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** धर्मनिष्ठा राष्ट्रनिष्ठा व कर्मनिष्ठ बाळगत माहेश्वरी समाजाने देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये मोलाचे योगदान दिले आहे. सध्याची सामाजिक परिस्थिती पाहता समाजाने समाजाच्या अस्तित्वासाठी मतभेद विसरून संघटित व्हावे, असे आवाहन माहेश्वरी समाजाचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत जाजू यांनी केले. माहेश्वरी समाजाचा वंश उत्पत्ती दिवस ज्येष्ठ शुद्ध नवमी म्हणजे महेश नवमी या दिवशी साजरा केला जातो.

सकाळी नवी पेठेतील गणपती मंदिरापासून भगवान महेशाच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये समाजातील सर्व बांधव स्त्री पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजप युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस कृष्णा पाटील राजळे, नगरसेवक, अमोल गर्जे, मोहन सुडके महाराज, जिल्हा संघटनेचे सदस्य अशोक मंत्री, हास्य कलाकार राजीव सुरवसे, ज्ञानेश्वर विद्यालयाचे संस्थापक महेंद्र शिरसाठ, यासह समाजातील सर्व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रतिमा पूजन करून मिरवणुकीला प्रारंभ झाला.

गेले तीन दिवस विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये बुद्धिबळ स्पर्धेमध्ये स्वप्निल पलोड, गोविंद लाहोटी, कुशल शर्मा, यांनी अनुक्रमे क्रमांक मिळवला. शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त समाजातील विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. वर्षभरामध्ये महिला मंडळाकडून घेण्यात आलेल्या विविध



स्पर्धांचाही पारितोषिक वितरण समारंभ मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. सांस्कृतिक कार्यक्रमापूर्वी वारकरी संप्रदायाचे जेष्ठ उपासक, कथाकार गोविंद जाटदेवळेकर महाराज, वेदशास्त्र संपन्न सर्वेश्वर शास्त्री, यांनी आशीर्वचन दिले.

कार्यक्रमा जिल्हाध्यक्ष श्रीकांत जाजू, नगरसेविका दिपाली बंग, संदीप मंत्री, डॉ. नितीन मालाणी व्यासपीठावर उपस्थित होते. महिला मंडळाच्या सदस्यांनी महेश वंदना सादर केली. यावेळी बोलताना जाजू म्हणाले, माहेश्वरी समाजाला सुमारे सव्वा पाच हजार वर्षांचा इतिहास आहे. भगवान शंकराच्या कृपाशीर्वादाने त्यांच्याच अंशात्मक रूपातून समाजाची उत्पत्ती झाली असा इतिहास आहे. बुद्धिमत्तांची खाण म्हणून ओळखला जाणारा समाज आज सामाजिक अनिष्ट परंपरा व चालीरीतींच्या गर्तेत गुरफटला जात आहे. येणारा काळ समाजासाठी फारसा सकारात्मक नाही. त्यामुळे आपणच वैरभाव व मानपानाचे मुद्दे बाजूला ठेवत समाज हितासाठी प्राधान्य द्यावे. आनंदाच्या क्षणी अथवा विवाह समारंभ प्रसंगी गेल्या पाच दहा वर्षात चुकीच्या प्रथा परंपरा समाज स्वास्थ्याच्या दृष्टीने त्रासदायक ठरत आहेत. कुठल्याही शुभकार्यामध्ये डीजे वाजवणार नाही, फुलो की होली, रंगो की होली, संगीत रजनी असले प्रकार आता थांबायला हवेत. यातून वेगळ्याच सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. लेकीबाळींचे सुरक्षा येणाऱ्या काळा त सर्वोच्च प्राधान्याने जपली जाईल. समाजाची आर्थिक उन्नती व्हावी, यासाठी समाजातील गरजूंचा गट तयार करून त्यांच्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. आर्थिक स्वावलंबन व धर्म विचाराच्या शिकवणीनुसार वाटचाल करण्यासाठी महेश नवमीचा दिवस संकल्प दिन म्हणून साजरा केला जात आहे. ग्रामीण भागातील समाज बांधवांबरोबर संवाद साधून त्यांनाही सामाजिक व्यासपीठावर सन्मानाने एकत्रित करण्याच्या योजनेला प्रारंभ झाला आहे. अहिल्यानगर जिल्ह्याचे माहेश्वरी समाजाचे कार्य राज्यात आदर्श व्हावे यासाठी सर्वांच्या सहकार्याने प्रयत्न केले जातील, असे जाजू म्हणाले.

**जाहीर नोटीस**

दि.२३/०६/२०२६

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविणात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात योगिता आनंद दासार, रा. मौजे नालेगाव, ता. जि. अहिल्यानगर यांनी आमचे अशिल इंडिया शेल्टर फायनान्स कार्पोरेशन लि. शाखा अहमदनगर या वित्त संस्थेकडे खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकतीबाबत तारणगहाण कर्ज प्रकरण केलेले आहे. त्या संदर्भात खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीसंदर्भात असणाऱ्या चेन डॉक्युमेंटस् पैकी अस्सल खरेदीखत दस्त क्र. ६४०१/२०११, दिनांक ०७/१२/२०११ जो दस्त भृंगमहाऋषी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या, नालेगाव, अ.नगर चे निवृत्त सभासद श्रीमती रझियाबेगम चाँद मणियार व भृंगमहाऋषी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या नालेगाव, अ.नगर चे नवीन सभासद सौ. कुसूम आदिनाथ शिंदे यांचे दरम्यानचे में दुय्यम निबंधक साहेब अहमदनगर १ यांचे कार्यालयात नोंदविण्यात आलेले होते. सदर खरेदीखतास भृंगमहाऋषी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या, नालेगाव, अ.नगर चे चेअरमन गणेश दगडू शिंदे यांनी मान्यता दिलेली आहे ते अस्सल खरेदीखत त्याच्या नोंदणी पावतीसह व इंडेक्ससह मागितले असता ते गहाळ झालेले आहे असे सदर कर्ज घेणार योगिता आनंद दासार यांनी आमच्या अशिलास सांगितलेले आहे, त्यासंदर्भात योगिता आनंद दासार यांनी सदर खरेदीखत हरविल्याची ऑनलाईन तक्रार अहिल्यानगर तालुका पोलिस स्टेशन येथे तक्रार क्र. १९३७२००३०७२६०००३४ दिनांक २३/०६/२०२६ रोजी दिलेली आहे. तरी सदर अस्सल खरेदीखत त्याच्या अस्सल नोंदणी पावती व इंडेक्स बाबत तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, कोणचेही कोणतेही खरेदीखत, साठेखत, विसार, गहाण, दान, बक्षीसपत्र, कर्ज, बोजा, लीज, लीन, वारसाहक्क, मुखत्यारपत्र, इच्छापत्र, कोर्ट मनाई हुकूम अव्वल जप्ती कोर्ट कार्यवाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध इजमेन्टरी राईटस, तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३ दिवसाच्या आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर समक्ष आणून द्यावी व त्याची रितसर पोहोच घ्यावी अथवा रजिस्टर पोस्टाने कळवावे मुदतीत कोणचीही कोणतीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकती संदर्भात कोणचीही कोणतीही तक्रार नाही व असल्यास त्याने ती जाणीवपूर्वक सोडून दिलेली आहे असे समजून सदर कर्जप्रकरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केलेली आहे.

**-परिशिष्ट-** डि।। अहमदनगर सब डि।। नगर पैकी मौजे नालेगाव येथील स.नं २३०/१+१/१+२अ+२ब प्लॉट नं १७३ याचे क्षेत्र ५५.०० चौ. मी. यांसी चतु: सिमा सरकारी रेकोर्डप्रमाणे व खरेदीखताप्रमाणे-येणेप्रमाणे मिळकत वागणुकीच्या वहिवाटीच्या हक्कासह काही एक राखून न ठेविता.

सही/-

शिक्का

**अ‍ॅड. गिरीष दयानंद लेले**
बी.एस्सी.एल.एल.बी
फ्लॅट नं ४ युवराज रेसीडेन्सी, गजराज फॅक्टरी जवळ,
भिस्तबाग, सावेडी, अहिल्यानगर, मो. ९८५०२९१२१६

# शेवगाव वन पर्यटन केंद्राला कायम कुलूप?

## अधिकाऱ्याच्या दुर्लक्षामुळे प्रकल्पाचा मूळ उद्देश धोक्यात

**प्रवीण खोमणे । राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** शेवगाव-पाथर्डी राज्य मार्गावर, शेवगाव शहरापासून सुमारे दीड किलोमीटर अंतरावर वन विभागाने पाच हेक्टर क्षेत्रात उभारलेले वन पर्यटन केंद्र सध्या दुर्लक्ष, अपूर्ण कामे आणि देखभालीअभावी ओस पडल्याचे चित्र आहे. सुमारे दीड कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेला हा प्रकल्प प्रत्यक्षात बहुतांश वेळा बंदच असल्याने शासनाच्या वनसंवर्धन आणि पर्यटनवृद्धीच्या उद्देशालाच तडा जात असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

वन विभागाने या प्रकल्पामागे पर्यटनाला चालना देणे, वनक्षेत्राबद्दल जनजागृती करणे तसेच प्राणी-पक्षी आणि वनस्पती संवर्धनाला हातभार लावणे हा उद्देश ठेवला होता.



मात्र प्रत्यक्षात या ठिकाणी केवळ उभारलेला सांगाडाच दिसून येतो. परिसरात ना पर्यटकांची वर्दळ दिसते, ना प्राणी-पक्ष्यांचे अस्तित्व जाणवते. शिवाय पाण्याअभावी अनेक झाडे अक्षरशः करपल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

पाथर्डीचे तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी अरुण साबळे यांच्या कार्यकाळात हा प्रकल्प उभारण्यात आला होता. शासनाकडून मोठा निधी खर्चूनही या केंद्राकडे येण्या-जाण्यासाठी अद्याप पक्का रस्ता उपलब्ध नाही. त्यामुळे शेवगाव-पाथर्डी राज्य मार्गावरून या ठिकाणी पोहोचताना नागरिकांना वेड्या बाभळीच्या झुडपांतून रस्ता शोधत जावे लागते. कोणतीही स्पष्ट दिशादर्शक व्यवस्था नसल्याने हे पर्यटन स्थळ नेमके कुठे आहे, असा प्रश्न प्रथमच येणाऱ्यांना पडतो.

गेल्या तीन वर्षांपासून हा वन पर्यटन प्रकल्प कार्यान्वित असल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात येथे नेमणूक असलेले वनमजूर चितळे आर. एस. हे नियुक्तीस्थळी सहसा उपस्थित नसल्याची तक्रार स्थानिकांकडून केली जात आहे. परिणामी, या पर्यटन स्थळी गेल्यानंतर मार्गदर्शनासाठी अथवा देखभालीसाठी जबाबदार व्यक्ती नेमकी कोण, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

वन विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या उदासीनतेमुळे शासनाचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प अपेक्षित उद्दिष्टांपासून दूर जात असल्याची भावना शेवगाव परिसरातील नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. त्यामुळे या वन पर्यटन केंद्राची तातडीने दुरुस्ती, देखभाल, पाणीपुरवठा आणि रस्त्याची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी जोर धरत आहे.

वन पर्यटन केंद्र कायम कुलूपबंद असल्याबाबत विचारले असता, एकशिंगे यांनी या ठिकाणची काही कामे अद्याप अपूर्ण असल्याचे सांगितले. तसेच, या पर्यटन स्थळाची नियमित देखभाल करण्यासाठी रोजंदारीवर मजूर उपलब्ध करून देण्याबाबत वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू असून, त्यासाठी लागणारा खर्च कसा उचलायचा याबाबतही विचारविनिमय सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### अधिकारी प्रशिक्षणावर; वनमजूराचा शोध

सध्या शेवगाव वनपरिक्षेत्राचा कार्यभार संदीप एकशिंगे यांच्याकडे असून, ते महिनाभराच्या दीर्घकालीन प्रशिक्षणासाठी चंद्रपूर येथे गेले आहेत. त्यामुळे येथील अतिरिक्त पदभार बबन मंचारे यांच्याकडे देण्यात आल्याची माहिती एकशिंगे यांनी दिली. दरम्यान, वनमजूर चितळे यांच्या अनुपस्थितीबाबत विचारणा केल्यानंतर संबंधितांचा शोध घेण्याची हालचाल सुरू झाल्याचे समजते.

# हसनापूर परिसरातील रस्त्यांची कामे करावी हर्षदा काकडे यांचे तहसीलदारांकडे निवेदन



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** तालुक्यातील मौजे हसनापूर येथील गावांना जोडणाऱ्या प्रमुख जुन्या पानंद रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाल्याने नागरिक, शेतकरी व विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या रस्त्यांची तातडीने पाहणी करून मुरमीकरण व खडीकरणासाठी आवश्यक प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी मा. जिल्हा परिषद सदस्या तथा हर्षदा काकडे यांनी हसनापूर ग्रामस्थांसमवेत शेवगावचे तहसीलदार आकाश दहाडदे यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, हसनापूर ते सोनेसांगवी, हसनापूर ते राक्षी, पाण्याची टाकी ते गारुडीबाबा मंदिर रस्ता तसेच हसनापूर शिवरस्ता ते चिमणदरा वस्ती हे गावांना जोडणारे प्रमुख पानंद रस्ते गेल्या अनेक वर्षांपासून वापरात आहेत. शेतजमिनीमधून जाणारे हे कच्चे व मातीचे रस्ते सध्या मोठमोठ्या खड्ड्यांनी भरले असून त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे.

पावसाळ्यात या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात चिखल साचत असल्याने रस्ते निसरडे व धोकादायक बनतात. या निवेदनावर विजय ढाकणे, संजय ढाकणे, एकनाथ ढाकणे, संदीप ढाकणे, नितीश धायगुडे, ज्ञानेश्वर नागरे, रावसाहेब बडे, अंकुश ढाकणे, प्रकाश धायगुडे, अशोक ढाकणे, प्रभाकर धायगुडे, संदीप विघ्ने, विश्वास ढाकणे, रविंद्र ढाकणे, अशोक शिरसाठ, अजिनाथ विघ्ने, रामनाथ खंडागळे यांच्यासह अनेक शेतकरी व ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

## द•ख•ल

### शहर वाहतुक शाखेचे पो.नि. महेश पाटील यांचा लक्झरी बस असो. कडून सत्कार



**नगर तालुका :** शहर वाहतूक शाखेचा पदभार स्वीकारलेल्या पा. नि. महेश पाटील यांचा अहिल्यानगर लक्झरी बस असोसिएशनच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष हनुमंत दारकुंडे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी चालक, मालक, वाहतूक पोलीस व नागरिक यांच्यात सुसंवाद आणि समन्वय राहणे आवश्यक असल्याचे मत हनुमंत दारकुंडे यांनी व्यक्त केले. शहरातील वाढती वाहतूक, रस्ते सुरक्षा आणि नियमांचे पालन यासाठी सर्व घटकांनी एकत्रितपणे कार्य केल्यास अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल असा विश्वासही दारकुंडे यांनी व्यक्त केला. पो. नि. महेश पाटील यांनीही वाहतूक शिस्त ही केवळ पोलिसांची जबाबदारी नसून नागरिक, वाहनचालक व वाहतूक व्यवसायाशी संबंधित सर्व घटकांच्या सहकार्यानेच ती प्रभावीपणे राबविता येत असल्याचे सांगितले. जनजागृती व प्रबोधनात्मक उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


### घर फोडून सव्वा लाखाची रोकड लंपास

**टाकळीमानुर :** पाथर्डी तालुक्यातील टाकळीमानुर परिसरातील तांबेवाडी येथील दादासाहेब गोपीनाथ तांबेयांची काल रात्री घर फोडी होऊनएक लाख २५ हजार रुपये रोख व ७० हजार रुपयांचे दागिनेअसा एकूण सुमारे दोन लाख रुपयांचीचोरी झाल्याची घटना सोमवारी रात्री घडली असून चोरीच्या घटना पडली असून घराच्या बांधकामा करिता त्यांनी बँकेतून रोख रक्कम काढून आणली होती. व घर बांधकाम करण्याकरिता शेजारीच विटावर विटा रुचून शेड करून ते त्यामध्ये राहत होते काल रात्री झोपले असताना शेडच्या पाठीमागील विटावर विटा रचलेल्या चोरांनी काढत सामानाची उचका पाचक करत एक लाख २५ हजार रुपये रोख व सोन्याचे दागिने घेऊन पसार झाला. ही घटना घडल्या नंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याचे काम चालू होते. टाकळीमानुर परिसरात अशा घटनांमध्ये वाढ झाली असून यामुळे टाकळी परिसरात घबराट पसरली असून प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

### सुपा चौकात अपघात : वृद्धाचा मृत्यू

**सुपा :** रस्ता ओलांडत असताना ६६ वर्षीय भाऊसाहेब रंगनाथ बांगर यांना भरधाव मोटारसायकलने जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला व शरीराच्या इतर भागांना गंभीर दुखापत झाली. जखमी अवस्थेत त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, भाऊसाहेब बांगर हे २० जून रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास सुपा चौकातील वंडर वाईन शॉपसमोर रस्ता ओलांडत होते. त्यावेळी पुण्याकडून नगरच्या दिशेने जाणाऱ्या एमएच १२ एक्सएस २४३० क्रमांकाच्या मोटारसायकलने त्यांना धडक दिली. अपघातानंतर मोटारसायकल चालक घटनास्थळावरून फरार झाला असून त्याच्याविरुद्ध सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

### तणावमुक्त आयुष्यासाठी योग महत्वाचा : प्रा. मेंडसुरे



**नगर तालुका :** आजच्या वेगवान स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनशैलीत शारीरिक व मानसिक स्वास्थ्य जपण्यासाठी योग हा सर्वोत्तम मार्ग असल्याचे प्रतिपादन धनगरवाडी येथील ऑर्किड इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या प्रणिता मेंडसुरे यांनी केले. शाळेत नुकताच १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी विविध योगासने आणि प्राणायामाचा सराव करून योगाचे महत्त्व अनुभवले. विशेष आकर्षण ठरली शाळेची माजी विद्यार्थिनी तथा पहिल्या नॅशनल पॅरा योगासन स्पर्धा २०२५-२६ ची सुवर्णपदक विजेती कु. दिया राजेंद्र जासूद. तिने उपस्थित राहून विविध योगासनांचे प्रभावी प्रात्यक्षिक सादर केले तसेच विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले. प्रा. प्रणिता मेंडसुरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, योगामुळे एकाग्रता वाढते. मन शांत राहते आणि निरोगी जीवनशैली अंगीकारण्यास मदत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजश्री राऊळ यांनी केले.

# घुटेवाडी ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर गंभीर आरोप

## चौकशी न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** घुटेवाडी ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी किशोर जेजूरकर यांच्यावर कार्यालयीन वेळेत अनुपस्थित राहणे, प्रशासकीय कामकाजात अडथळे निर्माण करणे, नागरिकांशी अरेरावीची भाषा वापरणे तसेच उत्पन्नाच्या स्रोतांबाबत चौकशी करण्याची मागणी करत ग्रामस्थांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तालुक्यातील घुटेवाडी येथील प्रदीप गव्हाणे यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, संबंधित अधिकारी अनेकदा ग्रामपंचायत कार्यालयात नियमितपणे उपस्थित राहत नसल्याने नागरिकांची कामे रखडत आहेत. शासनाच्या नियमानुसार गावात वास्तव्य करणे बंधनकारक असतानाही त्याचे पालन होत नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे.तक्रारीनुसार, विविध विकासकामे, शासकीय योजना आणि लाभार्थी प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्याच्या प्रक्रियेत टाळाटाळ होत असून त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढली आहे. तसेच नागरिकांनी विचारणा केल्यास संबंधित अधिकारी आपल्या पदाचा व संघटनात्मक प्रभावाचा धाक दाखवत असल्याचा गंभीर आरोप अर्जात करण्यात आला आहे.याशिवाय, ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांची व मालमत्तेची चौकशी करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. अधिकारी पदावर कार्यरत असताना आलिशान वाहनांचा वापर व आर्थिक स्रोतांविषयी प्रश्न उपस्थित करत संबंधित व्यक्तीच्या उत्पन्नाची आणि कुटुंबीयांच्या नावावरील मालमत्तेची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन केल्याचाही आरोप तक्रार अर्जात करण्यात आला असून या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या सर्व आरोपांची अद्याप अधिकृत चौकशी झालेली नसून संबंधित अधिकाऱ्यांची बाजू समोर आलेली नाही. चौकशीअंती वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.याबबत किशोर जेजुरकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांचा मोबाईल बंद असल्यामुळे संपर्क होऊ शकला नाही.

### अर्ज पाहून पुढील कारवाई करू
### ग्रामपंचायत उप मुख्याधिकारी दादाभाऊ गुंजाळ

ग्रामपंचायत अधिकारी किशोर जेजुरकर यांच्याबत झालेल्या तक्रारीसाठी दादाभाऊ गुंजाळ ग्रामपंचायत उप मुख्याधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले कि मी सध्या सुट्टीवर आहे आणि तो तक्रारी अर्ज अजून माझ्याकडे आलेला नाही तो अर्ज मिळाल्यावर त्याची सत्यता तपासून योग्य ती कारवाई करण्यात येईल.

# वेताळबाबा स्टेडियम निसर्गरम्य करण्यासाठी वराळांचे योगदान

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**निघोज :** वेताळबाबा स्टेडियम माध्यमातून निघोज व परिसरातील ज्येष्ठ व युवा मंडळींना नवीन उर्जा मिळाली असून हा परिसर निसर्गरम्य होण्यासाठी मेजर विकास वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांचे योगदान सर्वाधिक राहाणार असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ मार्गदर्शक तथा मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी अध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद यांनी व्यक्त केले आहे. मंगळवार दि.२३ रोजी पारनेर तालुका व शिरुर तालुका पत्रकार संघ, मळगंगा विद्यालय, आजी माजी सैनिक संघटना व निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांच्या वतीने वेताळबाबा स्टेडियम परिसरात पन्नास पेक्षा जास्त रोपांचे वनीकरण करीत वृक्षलागवड करण्यात आले. ही वृक्षलागवड ज्येष्ठ नेते व ज्येष्ठ मार्गदर्शक प्रभाकरशेठ कवाद, धर्मरक्षक प्रतिष्ठानचे अध्यक्ष पैलवान सुभाष वराळ, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त विठ्ठलराव कवाद, मुंबईकर मंडळाचे पदाधिकारी देवराम बुवा लामखडे,

यावेळी विकास वराळ, विलास हारदे, संजय बारहाते, बाबाजी वाघमारे, भास्करराव कवाद, अमोल खिलारी, सागर आतकर, आप्पासाहेब वराळ, दत्ताजी उनवने आदींच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मेजर गोपाळ वराळ, मेजर विजय वराळ, मेजर अमोल ठुबे, सुभेदार संजय लेंभे, मळगंगा विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रेखाताई हराळ, माळी सर,वरखडे सर, लेंभे सर, राहुल पोपळघट, शंकरराव वरखडे यावेळी उपस्थित होते. कवाद यावेळी म्हणाले गेली चार ते पाच वर्षात आजी माजी संघटनेचे पदाधिकारी कॅप्टन विठ्ठलराव वराळ, विकास वराळ, अमोल ठुबे व त्यांच्या सहकाऱ्यांनी या ठिकाणी असलेल्या मोकळ्या जागेत वेताळबाबा स्टेडियम उभे करुन गावचा नावलौकिक वाढवीला आहे. सकाळ व सायंकाळच्या सुमारास शेकडो युवक व ज्येष्ठ मंडळी या ठिकाणी येऊन योगा प्राणायाम करतात,चालण्याचा सराव करतात. क्रिकेट, फुटबॉल माध्यमातून खेळ खेळत व्यायाम करतात या स्टेडियमचा खरा फायदा ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणात होत असून या स्टेडियमचे खरे श्रेय आजी माजी सैनिक संघटनेला असून ग्रामस्थांनी लोकसहभागातून त्यांना पाठबळ दिल्याने जवळपास तीन एकर जागेत हे स्टेडियम उभे राहिले असून वृक्षारोपण केल्याने येत्या तीन वर्षांत या ठिकाणी परिसर निसर्गरम्य होईल अशी खात्री कवाद यांनी व्यक्त केली. यावेळी प्रभाकर कवाद व गावातील सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ यांचे मोठे सहकार्य असल्याने वेताळबाबा स्टेडियम जिल्ह्यात अग्रगण्य होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. विकास वराळ यांचा सत्कार शिरुर तालुका संजयजी बारहाते, बाबाजी वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आला.

# श्रीगोंदा नगरपरिषदेत लोकहिताच्या प्रश्नांना बगल

## शिवसेनेच्या नऊ नगरसेवकांचा सभात्याग

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** शहरातील रखडलेल्या विकासकामांबाबत आणि नागरिकांच्या ज्वलंत समस्यांवर चर्चा करण्यास सत्ताधाऱ्यांनी नकार दिल्याचा आरोप करत शिवसेनेच्या ९ नगरसेवकांनी मंगळवारी झालेल्या श्रीगोंदा नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेवर बहिष्कार टाकत तीव्र निषेध नोंदविला आहे.

श्रीगोंदा नगरपरिषदेत सर्व साधारण सभा आयोजित करण्यात आली होती त्यामध्ये शिवसेनेच्या ९ नगरसेवकांनी श्रीगोंदा शहरातील रखडलेल्या विकासकामांबाबत आणि नागरिकांच्या ज्वलंत समस्यांवर चर्चा करा असे म्हटल्यावर त्यावर चर्चा करण्यास सत्ताधाऱ्यांनी नकार दिल्याने नगरसेवकांनी सभात्याग केला त्यामध्ये रस्ते गटार वीज कचरा असे अनेक प्रश्न शिवसेनेच्या नगरसेवकांनी शहरातील विविध लोकहिताचे प्रश्न सभेत चर्चेसाठी घ्यावेत, अशी मागणी केली होती. यावेळी सुशीलकुमार शिंदे, बाबू धुमाळ, अनिल औटी, अख्तर शेख, ऋषिकेश बोरुडे, दिपाली बोरुडे, कोथिंबीरे भामाबाई, पल्लवी पोटे, अनिता औटी यांनी सभात्याग करत नगरपरिषदेच्या आवारात घोषणाबाजी करत निषेध नोंदवत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावाने घोषणाबाजी केली त्यामुळे शहरात चर्चेला चांगलेच उधान आले होते ते बोलताना म्हणाले कि शहराच्या विकासासाठी आणि जनतेच्या हक्कांसाठी आम्ही कोणत्याही संघर्षाला सामोरे जाण्यास तयार आहोत. जनतेच्या न्याय्य मागण्यांसाठी आमचा लढा यापुढेही सुरू राहील, अशी भूमिका शिवसेना नगरसेवकांनी यावेळी मांडली.




### विकासकामापेक्षा दारूची दुकाने सत्ताधार्यांना महत्वाची वाटतात का?

सर्वसाधारण सभेत विकासाच्या मुद्द्यावर चर्चा होणे अपेक्षित असताना दारूच्या दुकानासाठी परवाने मिळण्यासाठी नाहरकत देण्यासाठी चर्चा सुरु होती त्यामुळे सत्ताधार्यांना विकसापेक्षा दारूची दुकाने महत्वाची वाटतात का असा प्रश्न शिवसेनेच्या नगरसेविका दिपाली बोरुडे यांनी केला आहे.

# लिटिल वंडर स्कूलमध्ये योगदिवस



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** नगर तालुक्यातील जेऊर येथील लिटिल वंडर स्कूलमध्ये २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रार्थनेने करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेची प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून देताना नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते, एकाग्रता वाढते आणि निरोगी जीवनशैली अंगीकारण्यास मदत होते, असे सांगितले. कार्यक्रमादरम्यान शिक्षकांनी ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, वज्रासन आदी योगप्रकारांचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत योगाचे महत्त्व जाणून घेतले.

# सरसकट कर्जमाफीवर सरकारने तातडीने निर्णय घ्यावा

## अन्यथा २९ जूनला मराठवाड्यात तीव्र शेतकरी आंदोलन

## आ. रोहित पवार यांचा सरकारला इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** विनाअट सरसकट शेतकरी कर्जमाफीच्या मागणीसाठी आ. रोहित पवार यांनी पंढरपूरच्या पवित्र भूमीत केलेल्या अन्नत्याग आंदोलनानंतर राज्य सरकारने दिलेल्या आश्वासनाची अद्याप पूर्तता न झाल्याने त्यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेत कर्जमाफीच्या प्रश्नावर विधानसभेत सविस्तर चर्चा घडवून आणण्याची मागणी केली आहे.

पंढरपूर येथे झालेल्या आंदोलनादरम्यान मंत्री गिरीश महाजन यांनी आ. रोहित पवार यांची भेट घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केली होती. त्यावेळी अधिवेशनापूर्वी या विषयावर बैठक घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले; मात्र अद्यापही संबंधित बैठक आयोजित करण्यात आलेली नसल्याचे आ. रोहित पवार यांनी निदर्शनास आणून दिले.



यासंदर्भात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना दिलेल्या निवेदनात आ. पवार यांनी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी हटविण्याबाबत सभागृहात व्यापक चर्चा घडवून आणण्याची विनंती केली. तसेच शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार संबंधित विभागांचे मंत्री व वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत सर्वपक्षीय शिष्टमंडळाची तातडीने बैठक आयोजित करण्यासाठी शासनाला निर्देश द्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

या प्रस्तावित बैठकीसाठी आ. रोहित पवार यांच्यासह राजू शेट्टी, अजित नवले, शशिकांत शिंदे, हर्षवर्धन सपकाळ, अंबादास दानवे, सुधीर मुनगंटीवार, बच्चू कडू, जयंत पाटील (शेकाप), रघुनाथदादा पाटील, वामनराव चटप, रविकांत तुपकर, प्रवीणदादा गायकवाड, रविराज साबळे यांच्यासह विविध राजकीय पक्ष व शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींना सहभागी करून घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, विनाअट सरसकट शेतकरी कर्जमाफीबाबत सरकारने तातडीने निर्णय न घेतल्यास येत्या सोमवारी, २९ जून रोजी मराठवाड्यात शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा आ. रोहित पवार यांनी दिला असून सरकारने या इशाऱ्याची गांभीर्याने दखल घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# बारामती नगरपरिषदेकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भव्य स्मारकाला मंजुरी

## ५० मीटर उंचीचा टॉवर ठरणार प्रमुख आकर्षण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** बारामती नगरपरिषदेच्या मंगळवारी (दि. २३) झालेल्या सर्वसाधारण सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भव्य स्मारक उभारणीच्या प्रस्तावाला एकमताने मंजुरी देण्यात आली. बारामतीच्या विकासाचा इतिहास आणि अजित पवार यांच्या कार्याचा प्रेरणादायी प्रवास पुढील पिढ्यांसमोर मांडणारे हे स्मारक अत्याधुनिक स्वरूपात उभारण्यात येणार असून, त्यामध्ये ५० मीटर उंचीच्या स्मारकस्तंभासह तीन मजली संग्रहालय उभारण्यात येणार आहे.

नगराध्यक्ष सचिन सातव यांनी या संदर्भात माहिती देताना सांगितले की, प्रशासकीय भवनाशेजारील जागेत उभारण्यात येणाऱ्या स्मारकातील ५० मीटर उंचीच्या टॉवरवरून बारामती शहराचा सर्वांगीण विकास अनुभवता येणार आहे. अजित पवार यांच्या



विकासदृष्टी आणि राजकीय उंचीप्रमाणेच या स्मारकस्तंभाची उंचीही बारामतीतील सर्वाधिक असेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

स्मारक परिसरात तीन मजली अत्याधुनिक म्युझियम उभारण्यात येणार असून, त्यामध्ये अजित पवार यांना विविध मान्यवरांकडून प्राप्त झालेल्या भेटवस्तू आणि स्मृतिचिन्हांचे जतन करण्यात येणार आहे. तसेच त्यांच्या जनसंपर्काची ओळख असलेल्या 'जनता दरबार'ची प्रतिकृतीही येथे उभारली जाणार आहे. अजित पवार यांच्या जन्मापासून ते अखेरच्या श्वासापर्यंतचा जीवनप्रवास दृकश्राव्य माध्यमांच्या साहाय्याने उलगडण्यात येणार असून, त्यांच्या राजकीय, सामाजिक आणि विकासात्मक कार्याचा इतिहास भावी पिढ्यांसाठी जतन केला जाणार आहे.

बारामतीत येणाऱ्या प्रत्येक नागरिक आणि पर्यटकाला प्रेरणा मिळावी, तसेच अजित पवार यांचे कार्य आणि विकासाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने अत्यंत भव्य आणि आकर्षक असे हे स्मारक उभारण्याचा निर्णय नगरपरिषदेने घेतल्याचे सभेत नमूद करण्यात आले. दरम्यान, विविध नगरसेवकांनीही या स्मारकासंदर्भात महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. स्वच्छता हा अजित पवार यांचा आवडता विषय असल्याने स्वच्छता कर्मचाऱ्यांसोबतचा त्यांचा पुतळा उभारण्यात यावा, त्यांच्या नावाने शिष्यवृत्ती योजना सुरू करावी तसेच त्यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार देण्याची शिफारस राज्य शासनाकडे करण्यात यावी, अशा मागण्या नगरसेवकांनी सभागृहात केल्या.

उपनगराध्यक्षा श्वेता नाळे, मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्यासह बहुसंख्य नगरसेवक या बैठकीस उपस्थित होते. अजित पवार यांचे स्मारक हा सर्व बारामतीकरांसाठी भावनिक आणि अभिमानाचा विषय असून, या प्रकल्पाला तातडीने मूर्त स्वरूप देण्यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही नगराध्यक्ष सचिन सातव यांनी सभागृहास दिली.

---

**दखल**



## कोथळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

सासवड : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे आणि आर्थिक अडचणींमुळे त्यांच्या शैक्षणिक प्रवासात अडथळे येऊ नयेत, या उद्देशाने संघर्ष युवा प्रतिष्ठान, पुणे यांच्या वतीने विद्या महामंडळ प्रशाला, कोथळे येथील १० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधने मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला.

प्रशालेच्या आवारात झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना दप्तर, वह्या तसेच अन्य शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. संघर्ष युवा प्रतिष्ठानचे संस्थापक ज्ञानेश्वर जगताप यांच्या प्रेरणेतून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विजय जगताप, सचिव प्रमोद जगताप, सहसचिव राजेंद्र जगताप, खजिनदार तुषार खैरे, कार्यकर्ते लक्ष्मणराव जगताप, समर्थ जगताप आणि संगीता जगताप-भोईटे उपस्थित होते. कार्यक्रमास विद्या महामंडळ प्रशालेचे मुख्याध्यापक प्रशांत कदम, शिक्षक कैलास भोसले, शिक्षक किशोर भालेराव, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षकवर्ग आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

## लेफ्टनंट पार्थ समगीर यांचा श्री नाथ म्हस्कोबा देवस्थानच्या वतीने सत्कार



माळशिरस : पुरंदर तालुक्यातील श्री क्षेत्र वीर गावचे पार्थ अमोल समगीर यांची केंद्रीय लोकसेवा आयोग व संयुक्त सेवा परीक्षा या द्वारे इंडियन मिलिटरी अकॅडमी(आयएमए ) मध्ये लेफ्टनंट म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या या अभिनंदनीय कामगिरी बद्द्ल वीरच्या श्री नाथ म्हस्कोबा देवस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी पार्थ यांचे कुटुंबीय देखील हजर होते. देवस्थानचे मुख्य विश्वस्त, सर्व ट्रस्टी, गावकरी यांनी समगीर या भूमी पुत्राचे या कार्यक्रमात विशेष अभिनंदन केले. विराज धुमाळ, अमोल धुमाळ, काशिनाथ धुमाळ प्रसाद धुमाळ, सुनील धुमाळ, प्रमिला देशमुख , अमोल धोंडिबा धुमाळ, बाळासाहेब समगीर, छाया समगीर या मान्यवरांसह अनेक मंडळी कार्यक्रमास हजर होती

## नवउद्योजकांना मार्जिन मनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

पुणे : केंद्र शासनामार्फत स्टँड अप इंडिया योजना राबविण्यात येत असून, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नवउद्योजकांना उद्योग-व्यवसाय उभारणीसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यात येते. या योजनेला पूरक म्हणून महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत पात्र लाभार्थ्यांसाठी मार्जिन मनी सहाय्य योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीसाठीच्या सवलती घेण्यास पात्र असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नवउद्योजकांना उद्योग व्यवसाय सुरु करण्यासाठी आर्थिक मदत उपलब्ध करुन दिली जाते. योजनेच्या लाभासाठी प्रकल्प खर्चाच्या १० टक्के स्वहिस्स्याचा भरणा केल्यानंतर आणि संबंधित बँकेने स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत ७५ टक्के कर्ज मंजूर केल्यानंतर, उर्वरित १५ टक्के रक्कम फ्रंट एंड सबसिडी (मार्जिन मनी) स्वरुपात राज्य शासनामार्फत उपलब्ध करुन दिली जाते.

अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील इच्छुक व पात्र नवउद्योजकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधून योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन समाजकल्याण विभागाच्या प्रादेशिक उपआयुक्त वंदना कोचुरे यांनी केले आहे.

---

## युवकांच्या सहभागातून सक्षम महाराष्ट्र घडविण्याचा निर्धार : कृष्णराज महाडीक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पवित्र भूमीतून युवा शक्ती जागर यात्रेला प्रारंभ होत असल्याचा आनंद आहे. संत परंपरेने महाराष्ट्राला विचार व संस्कारांची दिशा दिली असून युवकांना विकास, संघटन आणि सामाजिक उत्तरदायित्वाशी जोडण्यासाठी ही यात्रा महत्त्वाची ठरेल, असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कृष्णराज धनंजय महाडीक यांनी केले.

श्री क्षेत्र आळंदी येथे संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीचे दर्शन घेऊन 'युवा शक्ती जागर यात्रा'च्या पुणे जिल्हा (उत्तर) दौऱ्याचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी कृष्णराज महाडीक यांच्या हस्ते माऊलींच्या चल पादुकांचे पूजन व अभिषेक करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मंडलाध्यक्ष वैजयंता उमरगेकर, संजय घुंडरे, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष गणेश कवडे, प्रिया पवार,



नगरसेवक दिनेश घुले, सोमनाथ कुऱ्हाडे, सचिन गिलबिले, सागर कुऱ्हाडे, रामचंद्र भोसले, गोविंद कुऱ्हाडे, नगरसेविका साक्षी कुऱ्हाडे, पुजा घुंडरे, माजी नगरसेविका सुनीता रंधवे, ज्ञानेश्वर रायकर, अनिकेत तापकीर, ॲड.आकाश जोशी, संकेत वाघमारे, माऊली बनसोडे, मनोहर दिवाणे तसेच भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यानंतर आळंदी देवस्थान येथे सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती घेऊन भाविकांसाठीच्या सुविधा व विकासकामांबाबत चर्चा करण्यात आली. देवस्थानचे विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील यांनी माहिती दिली. तसेच आळंदी नगरपरिषद येथे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्षा, नगरसेवक व संबंधित पदाधिकाऱ्यांशी थेट संवाद साधत सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा घेण्यात आला. भविष्यातील विकास आराखड्यावर चर्चा करून श्री क्षेत्र आळंदीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक बाबींवर विचारविनिमय करण्यात आला.दौऱ्यादरम्यान श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेला सदिच्छा भेट देऊन वारकरी विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला.

## महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी प्रमाणपत्र वाटप करा : डॉ. नीलम गोऱ्हे

**पुणे :** राज्य सरकार लवकरच 'महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक' विधिमंडळात मांडणार असून, या माध्यमातून महिला शेतकऱ्यांना अधिकृत ओळख, सन्मान आणि विकासाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या पार्श्वभूमीवर महिला शेतकऱ्यांना ग्रामपंचायतीमार्फत देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रांसोबतच 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व' अभियानांतर्गत आयोजित शिबिरांमधूनही प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात यावे, अशी महत्त्वपूर्ण सूचना शिवसेना नेत्या व विधानपरिषदेच्या मा. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानासंदर्भात गठीत करण्यात आलेल्या समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनात झालेल्या या बैठकीस समितीचे सदस्य उपस्थित होते.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, राज्यातील लाखो महिला शेतीच्या सर्व प्रक्रियांमध्ये प्रत्यक्ष योगदान देत असतानाही त्यांना शेतकरी म्हणून अधिकृत ओळख मिळत नाही. ही विसंगती दूर करण्यासाठी शासन महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक आणत असून, या कायद्यामुळे महिलांना शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता मिळेल. परिणामी शासकीय योजना, कर्जसुविधा, विमा संरक्षण, प्रशिक्षण आणि इतर लाभ त्यांच्यापर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचतील.

डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान हे केवळ जनजागृतीचे माध्यम न राहता प्रत्यक्ष लाभ देणारे अभियान ठरले पाहिजे. शिबिरांमधून महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण झाल्यास त्यांचा प्रशासनाशी थेट संपर्क वाढेल, तसेच त्यांच्या सक्षमीकरणाच्या प्रक्रियेलाही गती मिळेल.

---

## संघटनात्मक बळकटीसाठी विभागवार बैठका काळाची गरज : राजेंद्र कोंढरे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरूर :** मराठा समाजाची संघटनात्मक ताकद अधिक सक्षम करण्यासाठी विभागवार बैठका, सातत्यपूर्ण संवाद आणि नियोजनबद्ध कार्यपद्धती आवश्यक असून समाजासमोरील विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक आव्हानांवर मात करण्यासाठी एकजूट हाच प्रभावी मार्ग असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांनी केले.

शिरूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज बाजार समिती येथे आयोजित मराठा समाज संवाद बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. सकल मराठा समाज, दक्षिण पुणे, अखिल भारतीय मराठा महासंघ तसेच समविचारी संस्था



व संघटनांच्या संयुक्त विद्यमाने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना कोंढरे यांनी मराठा समाजाच्या संघटनात्मक बांधणीसाठी विभागनिहाय बैठका घेण्याची आवश्यकता अधोरेखित केली. तसेच विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन समाजापर्यंत पोहोचवून नव्या पिढीला सक्षम, सुशिक्षित व संघटित करण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. या बैठकीस अखिल भारतीय मराठा महासंघाच्या राष्ट्रीय सरचिटणीस शोभना पांचगे, पुणे जिल्हाध्यक्ष अंकुश लांडे, सरचिटणीस भास्कर पुंडे जिल्हा उपाध्यक्ष गणेश शिंदे, वर्षा काळे, शिरूर तालुका अध्यक्ष श्यामकांत वर्पे, महिला तालुका अध्यक्ष अर्चना डफळ, युवती अध्यक्षा मणिषा तरटे यांच्यासह मराठा समाजातील अनेक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ३ गंभीर गुन्ह्यांतील फरार सराईत गुन्हेगार दिगंबर शेडकर जेरबंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सासवड :** पुणे ग्रामीण दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) मोठी कारवाई करत तीन गंभीर गुन्ह्यांमध्ये फरार असलेल्या सराईत गुन्हेगार दिगंबर उर्फ दिग्या दशरथ शेडकर (वय २८, रा. चांबळी, ता. पुरंदर) याला सासवड येथून जेरबंद केले. जबरी चोरी, खंडणी, खुनाचा प्रयत्न आणि आर्म ॲक्टसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये तो मागील अनेक महिन्यांपासून फरार होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ ऑक्टोबर २०२५ रोजी बेलसर येथील सुरज अनिल जाधव यांना ट्रान्सफॉर्मर बंद न केल्याच्या कारणावरून दिगंबर शेडकर व त्याच्या साथीदारांनी लोखंडी रॉड व कोयत्याने मारहाण करून गंभीर जखमी केले होते. त्यानंतर तो फरार झाला होता. तसेच यापूर्वीही राहुल काळे यांच्याकडून अडीच लाख रुपयांची खंडणी उकळल्याचा आरोप त्याच्यावर आहे. यानंतर १९ मार्च २०२६ रोजी मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील क्रिकेट मैदानावर बॅनरवरील फोटो लावण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून अमोल आनंदा चौगुले यांच्यावर दिगंबर शेडकर व त्याच्या सहा साथीदारांनी पिस्तुलातून गोळीबार करून जीव घेण्याचा प्रयत्न केला होता. या तिन्ही घटनांप्रकरणी जेजुरी,



सासवड आणि शिरूर पोलीस ठाण्यांमध्ये गंभीर गुन्हे दाखल आहेत. दिगंबर शेडकर याच्याविरुद्ध यापूर्वीही राजगड, जेजुरी, सासवड आणि शिरूर पोलीस ठाण्यांमध्ये खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, खंडणी, दुखापत, आर्म ॲक्ट आणि मोक्का अंतर्गत एकूण १५ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. पोलीस अंमलदार मोसीन शेख आणि ओंकार शिंदे यांच्या पथकाने पाळत ठेवून वेशांतर करत आरोपीला सासवड येथून ताब्यात घेतले. आरोपीला फरार राहण्यासाठी मदत करणारे आणि त्याच्या संपर्कातील व्यक्तींचा शोध घेण्याचे काम सुरू असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

---

## विस्कळीत पाणी व्यवस्थापनावर नगरसेविका संपदा चौधर आक्रमक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** प्रभागातील विस्कळीत पाणी व्यवस्थापनाचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आणत नगरसेविका संपदा सुमित चौधर यांनी नगरपरिषदेच्या सभेत प्रशासनाला धारेवर धरले. नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा मिळत नसल्याने निर्माण झालेल्या परिस्थितीवर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

सभेमध्ये बोलताना चौधर यांनी अनेक वेळा रुई गावातील पाठपुरावा करूनही पाणी समस्येवर ठोस तोडगा निघालेला नसल्याची खंत व्यक्त केली. नटसम्राटमधील प्रसिद्ध संवादाचा संदर्भ देत त्यांनी, कुणी घर देता का घर...? एका म्हाताऱ्याला... एका नटसम्राटाला... या संवादाप्रमाणे आज आपल्या गावाची अवस्था झाली असून, नागरिकांना कुणी पाणी देता का पाणी...? देता का रे... कुणी पाणी देता का पाणी...? असे विचारण्याची वेळ आल्याची भावना व्यक्त केली.

यावेळी त्यांनी प्रभागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्येकडे लक्ष वेधत, वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करून नियमित पाणीपुरवठा करण्याची मागणी केली. त्यांच्या या मुद्द्यावर सभागृहात काही काळ सविस्तर चर्चा झाली. दरम्यान, बारामती शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या नीरा डावा कालव्याचे आवर्तन सध्या बंद असल्याने शहरासाठी आवश्यक प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध करण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर बारामती नगरपरिषदेने मंगळवार (ता. २३) पासून दोन दिवसाआड पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना पाणी वापराबाबत काटकसरीचे धोरण अवलंबण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. पाणीटंचाईमुळे नागरिकांमध्ये वाढत असलेली अस्वस्थता लक्षात घेता, नगरसेविका संपदा चौधर यांनी प्रशासनाने तातडीने प्रभावी नियोजन करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली.

## जगातील सर्वात मोठ्या ५२११ किलो पारद शिवलिंगाची भव्य प्राणप्रतिष्ठा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** श्री साई शिव गंगा धाम, हरिद्वार येथे जगातील सर्वात मोठ्या ५२११ किलो वजनाच्या पारद शिवलिंगाची तीन दिवसीय भव्य प्राणप्रतिष्ठा भक्तिभाव, वैदिक मंत्रोच्चार आणि आध्यात्मिक वातावरणात संपन्न झाली. या ऐतिहासिक सोहळ्यास देशभरातील दोन हजारांहून अधिक भाविक, संत-महंत, साधक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून साक्षीदार होण्याचा मान मिळविला.

या भव्य पारद शिवलिंगाची निर्मिती ध्यान गुरु रघुनाथ गुरुजी यांनी सुमारे दहा वर्षांच्या अखंड साधना, संशोधन आणि पारद विज्ञानाच्या सखोल अभ्यासातून केली आहे. शिवलिंगाच्या निर्मितीत पारा, चांदी, सोने तसेच १०८ प्रकारच्या औषधी वनस्पतींच्या अर्कांचा वापर करण्यात आला आहे. आध्यात्मिक क्षेत्रातील जाणकारांच्या मते, हे जगातील सर्वात मोठे पारद शिवलिंग असून भारतीय अध्यात्म, ध्यान परंपरा आणि पारद विज्ञानाचे अद्वितीय प्रतीक मानले



जात आहे. गुरु गोरक्षनाथ महाराजांच्या परंपरेच्या प्रेरणेने, गिरनारचे पूज्य पीर योगी महंत सोमनाथ बापू यांच्या आशीर्वादाने आणि पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा भव्य सोहळा पार पडला. रघुनाथ गुरुजी यांनी सांगितले की, हे शिवलिंग केवळ धार्मिक श्रद्धेचे प्रतीक नसून ध्यान, आत्मचिंतन आणि सकारात्मक चेतना जागृत करणारे एक आध्यात्मिक केंद्र आहे. यापूर्वी २०१९ मध्ये त्यांनी सुमारे दहा हजार लोकांच्या सहभागासह भव्य अश्वमेध यज्ञाचे आयोजन करूनही विशेष लक्ष वेधले होते.

या सोहळ्यास राघव चड्ढा, साध्वी ऋतंभराजी, जगद्गुरू शंकराचार्य स्वामीजी महाराज, श्री सुधांशुजी महाराज, स्वामी कैलाशानंद गिरीजी महाराज, स्वामी अवधेशानंद गिरीजी महाराज, स्वामी रविंद्र पुरीजी महाराज, श्री दिनेशचंद्रजी, विश्व हिंदू परिषदचे वरिष्ठ पदाधिकारी, आचार्य मनीषजी (ककखचड) तसेच राज्य मंत्री व गंगा सभा अध्यक्ष नितीन गौतम यांच्यासह अनेक संत-महंत आणि मान्यवर उपस्थित होते.

समारोप प्रसंगी ध्यानातून शांती, शांतीतून सद्भाव आणि सद्भावातून विश्वकल्याण हा संदेश देण्यात आला. उपस्थितांनी या भव्य सोहळ्याला अध्यात्म, विज्ञान, सेवा आणि मानवकल्याण यांचा ऐतिहासिक संगम संबोधत भारतीय आध्यात्मिक परंपरेचा गौरवशाली क्षण असल्याचे मत व्यक्त केले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

बुधवार दि.२४ जून २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८


## विजेच्या तारा कोसळून आठ गायींचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : देवळाली प्रवरा येथील लाख रोड परिसरात काल मंगळवारी दुपारी घडलेल्या दुर्दैवी घटनेत विजेच्या तारा कोसळून आठ गायींचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून शेतकरी मच्छिंद्र काळे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारच्या सुमारास परिसरात रिमझिम पावसासह जोरदार वादळी वारे वाहत होते. अचानक आलेल्या वादळामुळे वीजवाहक तारा तुटून खाली कोसळल्या. यावेळी मच्छींद्र बापू काळे यांच्या जनावर गोठ्याच्या परिसरात विद्युत प्रवाह पसरल्याने गोठ्यातील आठ गायींना जोरदार शॉक बसला.



काही क्षणांतच ८ गायी जागीच मृत्युमुखी पडल्याने काळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. घटनेची माहिती मिळताच नगराध्यक्ष सत्यजीत कदम, शेतकरी सेनेचे रवींद्र मोरे, माजी नगरसेवक डॉ. संदीप मुसमाडे यांच्यासह स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी भेट देत मदतकार्य तसेच नगराध्यक्ष कदन यांनी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तातडीने पंचनामा करण्याबाबत सांगितले. दरम्यान शासनाकडून तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी काळे कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकांनी केली आहे.

या घटनेमुळे वादळी पावसाच्या पार्श्वभूमीवर वीजवाहिन्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## रस्ता तुझ्या बापाचा आहे का?
### म्हणत तरुणावर बीअरच्या बाटल्यांनी हल्ला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून दोन मित्रांवर बीअरच्या काचेच्या बाटल्यांनी हल्ला केल्याची धक्कादायक घटना शिर्डीत घडली. या प्रकरणी तिघांविरुद्ध शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निसार कादर शेख (वय ४२, रा. स्वामी विवेकानंदनगर, शिर्डी) हे स्वतःची इर्टिगा गाडी चालवून उदरनिर्वाह करतात. १ जून रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास ते मित्र विशाल बाबासाहेब पटेकर यांच्यासह निमगावकडे जात होते. बी.एम. बीअर शॉपीसमोर वाहन थांबवून विशाल पटेकर एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले असता निसार शेख गाडीत बसले होते. यावेळी स्कुटीवरून आलेल्या संदीप मते, अमोल आप्पासाहेब मते उर्फ बन्या आणि सोमनाथ गायकर यांनी गाडीसमोर येत वाद घालण्यास सुरुवात केली. हा रस्ता तुझ्या बापाचा आहे का? असे म्हणत त्यांनी गाडीच्या दरवाजाला लाथा मारल्या आणि हातातील बीअरच्या काचेच्या बाटल्यांनी निसार शेख यांच्यावर हल्ला केला. त्यांना वाचवण्यासाठी आलेल्या विशाल पटेकर यांनाही मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात दोघे गंभीर जखमी झाले असून आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास शिर्डी पोलीस करीत आहेत.

## सोनई पोलिसांची अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : नेवासा तालुक्यातील सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरित्या सुरू असलेल्या वाळू वाहतुकीविरोधात सोनई पोलिसांनी प्रभावी कारवाई करत सुमारे ५ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू उपसा आणि वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली. पोलिसांच्या धडक मोहिमेचे सर्वत्र स्वागत होत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ( दि.२२ ) जून रोजी रात्री ९ वाजण्याच्या दरम्यान मतमाऊली मंदिराजवळ एका टेम्पोद्वारे अवैधपणे वाळूची वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती सोनई पोलिसांना मिळाली होती. या माहितीची तत्काळ दखल घेत सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली रात्री गस्तीवर असलेल्या पथकाने सापळा रचला.या कारवाईत एमएच १७ केए २७९३ क्रमांकाचा टेम्पो ताब्यात घेण्यात आला. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये कोणतीही वैध परवानगी अथवा आवश्यक कागदपत्रांशिवाय वाळूची वाहतूक सुरू असल्याचे आढळून आले. याप्रकरणी आशिर्वाद दिलीप भुसारी (रा. दत्तनगर सोनई) आणि वैभव वाघ (रा. सोनई) यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. पोलीस हेड कॉन्स्टेबल बाळासाहेब बाचकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा रजिस्टर क्रमांक २८१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०३(२) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत टेम्पोसह वाळू असा एकूण ५ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल बाळासाहेब तागड करीत आहेत.

## दिराविरोधात विनयभंग व मारहाणीचा गुन्हा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**घारगाव** : घरच्या जवळून का फिरतोस, अशी विचारणा केल्याचा राग मनात धरून चुलत दिराने पती-पत्नीला भररस्त्यात अडवून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली. या मारहाणीत संशयित आरोपीने एका महिलेचा विनयभंग करून तिच्या गळ्यातील मंगळसूत्र तोडून नेल्याची फिर्याद घारगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. तान्हाजी सुरेश मुंडे (रा. आंबीखालसा, ता. संगमनेर) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित चुलत दिराचे नाव आहे. याप्रकरणी पीडित महिलेने घारगाव पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, (दि.२२) जून रोजी सकाळी आरोपी तान्हाजी हा पीडितेच्या घराच्या पाठीमागून जात असताना, त्याला घराजवळ येऊ नको असे म्हटल्याने त्याने पती-पत्नीला शिवीगाळ व धमकी दिली होती. यानंतर संध्याकाळी ७:३० वाजताच्या सुमारास पीडिता व तिचे पती हे औषध घेऊन मोटरसायकलने (क्रमांक एमएच- १४ बी ई- ५५०५) आंबीखालसाकडे परतत होते. आंबीफाटा ते चास जाणाऱ्या रोडवर प्रभाकर भोर विद्यालयासमोर आरोपीने त्याची मोटरसायकल आडवी मारून त्यांची गाडी थांबवली. सकाळी जास्त बोलत होते असे म्हणत आरोपीने पीडितेच्या पतीला गाडीवरून खाली ओढून बेदम मारहाण सुरू केली. पतीला सोडवण्यासाठी महिला मध्ये पडली असता आरोपीने तिलाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, तसेच अंगावरील कपडे फाडून लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले व गळ्यातील मंगळसूत्र तोडून तो पसार झाला. घारगाव पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## वृत्तांकनाची किंमत जीवावर?
### वाळू तस्करीचे वृत्त प्रसिद्ध केल्याचा राग । पत्रकाराच्या घरात घुसून पिस्तूल रोखत धमकी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रकारितेवर दबाव आणण्याचा गंभीर प्रकार संगमनेर तालुक्यात उघडकीस आला आहे. अवैध वाळू उपसा आणि वाळू तस्करीसंदर्भातील वृत्तांकन केल्याच्या कारणावरून पत्रकार सहदेव भिकाजी जाधव यांना त्यांच्या घरात घुसून पिस्तूल रोखत जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे पत्रकारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. साकूर येथील पत्रकार सहदेव जाधव यांनी पठार भागातील मुळा नदीपात्रातून सुरू असलेल्या कथित अवैध वाळू उपशाबाबत तसेच अकलापूर येथील शेतकरी बाळासाहेब फापाळे यांच्या वाहनाला डंपरची धडक देऊन जीवे मारण्याचा प्रयत्न झाल्याच्या घटनेचे वृत्त प्रसिद्ध केले होते.

या वृत्तांकनामुळे काही वाळू तस्कर नाराज झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. जाधव यांच्या म्हणण्यानुसार, १७ जून रोजी रात्री सुमारे आठ वाजता ते कुटुंबासह घरी असताना दोन जण त्यांच्या घरात आले. त्यापैकी एकाने संबंधित डंपर आपलाच असल्याचे सांगत वृत्तांकनाबाबत जाब विचारला. त्यानंतर कथितरित्या बातमी प्रसिद्ध करू नये म्हणून सुरुवातीला पैशांचे आमिष दाखविण्यात आले. दहा हजार, वीस हजार ते पन्नास हजार रुपये देण्याची तयारी असल्याचे सांगण्यात आले.

मात्र जाधव यांनी त्यास स्पष्ट नकार दिला. यानंतर वातावरण तणावपूर्ण बनले. जाधव यांच्या आरोपानुसार, संबंधित व्यक्तींनी कमरेला लावलेले पिस्तूल काढून धमकी दिली. आम्हाला प्रेमाने सांगता येते आणि ठोकताही येते, माझ्या नादाला लागशील तर गाडीच्या चाकाखाली घालीन अशा शब्दांत जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यानंतर दोघेही तेथून निघून गेले. या घटनेनंतर जाधव यांनी कुटुंबीयांसह घारगाव पोलीस ठाणे गाठून तक्रार देण्याचा प्रयत्न केला. मात्र गुन्हा दाखल न झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. न्याय मिळावा आणि आपल्या जीविताचे संरक्षण व्हावे या अपेक्षेने त्यांनी रात्रभर पोलीस ठाण्याच्या पायरीवर बसून प्रतीक्षा केली. अखेर पोलिसांनी त्यांचा तक्रार अर्ज स्वीकारला.

मात्र गुन्हा दाखल झाला नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, या घटनेमुळे पत्रकार संघटना आणि सामाजिक क्षेत्रातून चिंता व्यक्त केली जात आहे. अवैध धंद्यांविरोधात आवाज उठविणाऱ्या पत्रकारांना धमकावण्याचे प्रकार वाढत असतील तर तो लोकशाहीसाठी धोक्याचा इशारा असल्याची भावना व्यक्त होत आहे. पत्रकारांना निर्भय वातावरणात काम करता यावे आणि या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी होत आहे.

#### पत्रकार सहदेव जाधव यांना नेमकी धमकी कशामुळे?

मुळा नदीपात्रातील कथित अवैध वाळू उपसा आणि शेतकऱ्याच्या वाहनाला डंपरची धडक देण्याच्या घटनेचे वृत्तांकन केल्यानंतर काही वाळू तस्कर नाराज झाले. याच वृत्तांकनाचा राग मनात धरून धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

#### रात्रभर न्यायाची प्रतीक्षा

तक्रार देण्यासाठी घारगाव पोलीस ठाण्यात गेलेल्या पत्रकार सहदेव जाधव यांनी गुन्हा दाखल व्हावा यासाठी रात्रभर पोलीस ठाण्याच्या पायरीवर बसून प्रतीक्षा केल्याचा दावा केला आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी चर्चा रंगली आहे.

## वडिलांचे किडनीदान; मुलीला दिले नवजीवन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री





**करंजी** : बाप हा आपल्या मुलांच्या सुखासाठी कोणत्याही संकटाला सामोरा जाऊ शकतो, याचा प्रत्यय देणारी प्रेरणादायी घटना पाथर्डी तालुक्यातील दुले चांदगाव येथे घडली आहे. न्यू इंग्लिश स्कूल, आदिनाथनगर येथील शिक्षक चंद्रकांत भगवान पाचरणे यांनी आपल्या मुलीच्या जीवासाठी स्वतःची किडनी दान करून तिचे प्राण वाचविले आहेत. पाचरणे यांची मुलगी निकिता निलेश वाकचौरे या गेल्या काही काळापासून किडनीच्या गंभीर आजाराने त्रस्त होत्या. वैद्यकीय तपासणीनंतर त्यांना किडनी प्रत्यारोपणाची गरज असल्याचे स्पष्ट झाले. योग्य दाता शोधला जात असताना वडील चंद्रकांत पाचरणे यांनी कोणतीही तमा न बाळगता स्वतःची किडनी दान करण्याचा निर्णय घेतला. आवश्यक वैद्यकीय तपासण्या पूर्ण झाल्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील सिग्मा हॉस्पिटलमध्ये डॉ. प्रदीप सारूक यांच्या मार्गदर्शनाखाली किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. अवघ्या ५६ दिवसांत सर्व प्रक्रिया पूर्ण करून हे प्रत्यारोपण करण्यात आले. सध्या किडनीदाता चंद्रकांत पाचरणे आणि किडनी प्राप्तकर्ता निकिता वाकचौरे यांची प्रकृती समाधानकारक आहे. ज्या वडिलांनी मुलीच्या विवाहावेळी कन्यादान केले, त्याच वडिलांनी आज तिच्या आयुष्यावर आलेले संकट दूर करण्यासाठी किडनीदान करून तिला नवजीवन दिले. या काळात आदिनाथ कृषि विकास प्रतिष्ठानचे सहकारी, मित्रपरिवार तसेच आ. मोनिकाताई राजळे व राहुलदादा राजळे यांनीही मोलाचे सहकार्य केले. या घटनेमुळे परिसरात पाचरणे यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून अवयवदानाबाबत समाजात सकारात्मक जागृती निर्माण होत आहे.

## 'कृषी दीपक'चा परवाना निलंबित
### खरीप हंगामाच्या तोंडावर खतांच्या 'लिंकिंग'ला चाप!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना खतांसोबत इतर कृषी निविष्ठांची सक्ती केल्याच्या प्रकारावर कृषी विभागाने मोठी कारवाई केली आहे. कोपरगाव तालुक्यातील कृषी दीपक कृषी सेवा केंद्र येथे झालेल्या तपासणीत विविध अनियमितता आढळून आल्याने संबंधित खत विक्री परवाना एक महिन्यासाठी निलंबित करण्यात आला आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्या आदेशाने ही कारवाई करण्यात आल्याने जिल्ह्यातील खत विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या गुणवत्ता नियंत्रण पथकाने १६ एप्रिल २०२६ रोजी कृषी दीपक कृषी सेवा केंद्राची तपासणी केली होती. यावेळी खत साठा नोंदी व प्रत्यक्ष साठ्यात तफावत, आवश्यक नोंदींचा अभाव, खत साठा फलक न लावणे, विक्री बिलांमध्ये अपूर्ण माहिती तसेच खत विक्रीशी संबंधित नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले. या अनियमिततांमध्ये शेतकऱ्यांना खतांसोबत इतर कृषी निविष्ठांची सक्ती (लिंकिंग) केल्याचाही मुद्दा तपासादरम्यान समोर आल्याचे सांगण्यात आले आहे. तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित विक्रेत्यास नोटीस बजावून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात सुनावणी घेण्यात आली. मात्र सुनावणीदरम्यान समाधानकारक खुलासा न झाल्याने खत नियंत्रण आदेश १९८५ व अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत कारवाई करत कृषी दीपक कृषी सेवा केंद्राचा रासायनिक खत विक्री परवाना २८ जून २०२६ ते २७ जुलै २०२६ या कालावधीसाठी निलंबित करण्यात आला आहे. खरीप हंगामात खतांची मागणी वाढलेली असताना काही विक्रेत्यांकडून शेतकऱ्यांना खतांसोबत कीटकनाशके, सूक्ष्म अन्नद्रव्ये किंवा इतर उत्पादने खरेदी करण्याची सक्ती केल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत असतात. अशा पार्श्वभूमीवर कृषी विभागाने केलेली ही कारवाई जिल्ह्यातील इतर विक्रेत्यांसाठी इशारा मानली जात असून, शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी तपासणी मोहीम अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

## ८० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाचले..!
### बोरावके महाविद्यालय प्रशासनाचा फेरपरीक्षेचा निर्णय; अभाविपच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : नापास झाल्यानंतर पुढील शिक्षण, नोकरी आणि भवितव्याबाबत चिंतेत सापडलेल्या विद्यार्थ्यांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. श्रीरामपूर येथील बोरावके महाविद्यालयातील बीसीएस तृतीय वर्षाच्या परीक्षेत मोठ्या संख्येने विद्यार्थी नापास झाल्यानंतर निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीची दखल घेत महाविद्यालय प्रशासनाने फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सुमारे ७५ ते ८० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्यापासून वाचणार आहे. बोरावके महाविद्यालय ही स्वायत्त संस्था असून बीसीएस तृतीय वर्षाच्या परीक्षेसाठी एकूण १८० विद्यार्थी बसले होते. निकाल जाहीर झाल्यानंतर तब्बल ६७ विद्यार्थी नापास झाल्याचे समोर आले.

एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. नोकरीच्या संधी हुकण्याची भीती, पुढील शिक्षणासाठी प्रवेश न मिळण्याची शक्यता आणि काही विद्यार्थिनींच्या ठरलेल्या विवाहांवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर काही विद्यार्थ्यांनी विद्यार्थी चळवळीतील कार्यकर्त्यांशी संपर्क साधून आपली व्यथा मांडली. अभाविपचे माजी जिल्हा संयोजक प्रथमेश जोशी यांनी विद्यार्थ्यांच्या अडचणीची गंभीर दखल घेत स्वायत्त महाविद्यालयांचे नियम, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक सूचना आणि इतर संस्थांमधील तत्सम निर्णयांचा अभ्यास सुरू केला. विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊ देणार नाही, असे आश्वासन त्यांनी विद्यार्थ्यांना दिले.

त्यानंतर विद्यार्थी कार्यकर्ते दिगंबर माने यांच्या पुढाकाराने सर्व प्रभावित विद्यार्थ्यांना एकत्र आणण्यात आले. विद्यार्थ्यांच्या वतीने महाविद्यालय प्रशासनाकडे फेरपरीक्षा घेण्याची औपचारिक मागणी करण्यात आली. सुरुवातीला प्रशासन आपल्या भूमिकेवर ठाम असल्याचे दिसून आले. मात्र विद्यार्थ्यांनी इतर स्वायत्त संस्थांमधील निर्णय, परिपत्रके आणि नियमांची उदाहरणे प्रशासनासमोर मांडली. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर अखेर महाविद्यालय प्रशासनाने सर्व बाबींचा अभ्यास करून फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केला. येत्या वीस दिवसांत फेरपरीक्षा घेऊन तातडीने निकाल जाहीर करण्यात येणार असल्याचे आश्वासन प्रशासनाने दिले आहे. या निर्णयामुळे अनेक विद्यार्थ्यांना नवसंजीवनी मिळाली असून पालकांनीही समाधान व्यक्त केले आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी संघटित प्रयत्न केल्यास सकारात्मक परिणाम मिळू शकतो, याचे हे एक उत्तम उदाहरण मानले जात आहे. या पाठपुराव्यात अभाविपचे माजी जिल्हा संयोजक प्रथमेश जोशी, विद्यार्थी कार्यकर्ते दिगंबर माने, तेजस उंडे, प्रथमेश पांडे, रोशन भावसार, श्याम शिरसाठ, आयुष पोपळघट, श्रद्धा शेळके, वरद यशवंत आणि इतर विद्यार्थ्यांनी सक्रिय भूमिका बजावली.

**बीसीएस तृतीय वर्षातील १८० विद्यार्थ्यांपैकी ६७ विद्यार्थी नापास**
**विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाण्याची भीती**
**अभाविपच्या पाठपुराव्यानंतर फेरपरीक्षेचा निर्णय**
**२० दिवसांत परीक्षा व निकाल जाहीर होणार**
**सुमारे ७५ ते ८० विद्यार्थ्यांना मोठा दिलासा**

## कर्मवीर अण्णा आणि पद्मश्री डॉ. विखेंच्या भेटीने घडली प्रवरेत शैक्षणिक क्रांती!
### महात्मा गांधी विद्यालयाच्या अमृत महोत्सवी वर्षाने मिळाला जुन्या आठवणींना उजाळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : रयत शिक्षण संस्थेच्या प्रवरानगर येथील महात्मा गांधी विद्यालयाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील आणि पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या भेटीतून सुरू झालेल्या शैक्षणिक क्रांतीच्या पर्वाला उजाळा मिळाला आहे. कर्मवीर अण्णा आणि पद्मश्री डॉ. विखे पाटील यांची प्रवरा परिसरातील भेट राज्याच्या सामाजिक व शैक्षणिक परिवर्तनाला नवी दिशा देणारी होती.

महात्मा गांधी विद्यालयाचा अमृत महोत्सव संपन्न होत असताना या ऐतिहासिक भेटीच्या आठवणींना मिळालेला उजाळा पंच्याहत्तर वर्षांनंतर सुद्धा स्मरणात राहतो; कारण प्रवरा परिसराने शैक्षणिक क्षेत्रात उभे केलेल्या कामाला सुद्धा या दोन्ही थोर विभूतींच्या भेटीचीच प्रेरणा लाभली होती. सहकार चळवळीची भूमी म्हणून प्रवरा परिसराची जडणघडण पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या माध्यमातून सुरू झाली होती. सहकार चळवळीने आर्थिक परिवर्तनाला मोठी साथ



मिळाली. कर्मवीर अण्णांनी प्रवरा परिसरात येऊन पद्मश्री विखे पाटील यांनी सहकार चळवळीची निर्माण केलेली क्रांती जवळून अनुभवली होती. सहकार चळवळीच्या निर्मितीमुळे आर्थिक परिवर्तनाचा मार्ग मिळेल, परंतु सामाजिक परिवर्तनाची लढाई यशस्वी करायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही, या मतावर दोन्ही विभूतींचे एकमत होते.

त्यामुळेच दुर्गम भागात शिक्षणाच्या संधी निर्माण करून दिल्या तर समाज साक्षर होईल, या उद्दिष्टाने सहकार चळवळीच्या पाठबळाने शैक्षणिक चळवळ सुद्धा यशस्वी करण्याचा दृढ निश्चय कर्मवीर भाऊराव पाटील आणि पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी केला. कर्मवीर अण्णांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची दारे खुली केली. प्रवरानगर येथे रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा गांधी विद्यालयाची उभारणी करण्याचे ठरले तेव्हा रयतच्या या ज्ञानमंदिर उभारणीसाठी पद्मश्रींनी पुढाकार घेतला.

प्रवरा परिसरातील शेतकऱ्यांचे योगदान सुद्धा यासाठी सत्कारणी लागले. आशिया खंडातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याकडे प्रवरा परिसरातील शेतकरी ऊस गाळपासाठी देत. ऊसाच्या बिलातून पद्मश्रींनी प्रतिटन २५ पैसे एवढीच रक्कम कट करून जमलेला निधी कर्मवीर अण्णांच्या हाती सुपूर्द केला आणि महात्मा गांधी विद्यालयाच्या उभारणीसाठी सहकार चळवळीच्या मदतीचा हात पुढे केला. पद्मश्रींनी सुरू केलेल्या पहिल्या इंग्रजी माध्यमातील शाळेपासून प्रवरा परिसराच्या यशस्वी शैक्षणिक प्रवासाची सुरुवात म्हणावी लागेल. काळाच्या ओघात लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी कर्मवीर अण्णा आणि पद्मश्रींच्या विचाराने ग्रामीण शिक्षणाला दिलेली नवी दिशा परिसरातील पुढच्या पिढीचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी उपयुक्त ठरली.

अनेक पिढ्या या शिक्षणाच्या पंढरीतून ज्ञानाची शिदोरी घेऊन जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचल्या; पण प्रवरेच्या भूमीत सुरू झालेल्या क्रांतीचे आपण घटक आहोत, ही आत्मीयता आज कुठेही कमी झालेली नाही.